। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ४७ वा । गुरूवार दिनांक २३ एप्रिल, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### दोघांनी केली ट्रॅक्टरची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी हरिदास व्यंकटराव विर, वय ५८ वर्षे, रा. वीर वस्ती शेंडी ता. वाशी जि. धाराशिव यांचा ट्रॅक्टर क्र एमएच २५ एएल०३०८ हा दि.२०.०४.२०२६ रोजी दहिफळ शिवारातील फिर्यादीचे घरासमोरुन प्रकाश रा. लोणखस, ता. वाशी जि. धाराशिव इतर दोन अनोळखी इसम हे जबरदस्तीने घेवून जात असताना फिर्यादीस मिळून आले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-हरिदास विर यांनी दि.२१.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०९(४),३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### डोमगाव रोडचे ओढ्याजवळून मोटारसायकलची चोरी

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-मुकेश आण्णा यादव, वय ३१ वर्षे, रा. बावची ता. परंडा जि. धाराशिव यांची अंदाजे ४०,००० किंमतीची मोटरसायकल डोमगाव रोडचे ओढ्याचे जवळुन सोनारी यात्रेमधुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मुकेश यादव यांनी दि.२०.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सोन्याचे दागिने व रोख रक्कमेची बोर्डा येथून चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत काळे, वय ५९ वर्षे, रा. बोर्डा ता. कळंब जि. धाराशिव यांचे राहते घराचे चॅनल गेटचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि. २०.०४.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन कपाटातील १२४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ८०,००० असा एकुण ३,९८,२५० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-भारत काळे यांनी दि.२१.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४),३०५(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### शटरचे कुलूप तोडून केली चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी उमाकांत दासराव जगधने, वय ४६ वर्षे, रा. संभाजीनगर डिकसळ ता. कळंब जि. धाराशिव यांचे श्रध्दा बॅग हाउस दुकानाचे शटर अज्ञात व्यक्तीने उचकटून आत प्रवेश करुन कॅश काउंटर मधील ड्रॉवर तोडून १५,००० रोख रक्कम चोरुन नेली. तसेच फिर्यादी यांचे शेजारी लाईमध्ये नगरपरिषद शॉपींग सेंटर मधील गाळ्यात असलेले मॉडर्न कलेक्शन व शिंदे क्लॉथ सेंटर या दोन दुकानाचे शटरचे कुलूप तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-उमाकांत जगधने यांनी दि.२१.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## समुपदेशन केंद्रांचा आधार : एका वर्षात ४२८ महिलांना दिलासा,नव्या आयुष्याची मिळाली दिशा



धाराशिव दि.२२ एप्रिल (जिमाका) मानसिक तणाव, कौटुंबिक वाद आणि सामाजिक अडचणींमुळे अनेकदा व्यक्ती एकटेपणात अडकून पडते.अशा वेळी योग्य मार्गदर्शन आणि भावनिक आधार मिळाला,तर आयुष्याला नव्याने दिशा मिळू शकते.याच उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून जिल्ह्यात कार्यरत असलेली समुपदेशन केंद्रे अनेकांसाठी आशेचा किरण ठरत आहेत.धाराशिव जिल्ह्यात सध्या ०४ पोलीस समुपदेशन केंद्रे पोलीस स्टेशनच्या आवारात कार्यरत आहेत.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत या केंद्रांनी उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. धाराशिव समुपदेशन केंद्राने २०९ प्रकरणांतील महिलांचे समुपदेशन केले,वाशी केंद्राने २४,कळंब केंद्राने ३८ तर उमरगा केंद्राने १५७ प्रकरणांतील महिलांना मार्गदर्शन केले.अशा प्रकारे एकूण ४२८ महिलांना या केंद्रांद्वारे आधार देण्यात आला.

समुपदेशन केंद्र म्हणजे व्यक्तींना त्यांच्या मानसिक,भावनिक, सामाजिक किंवा कौटुंबिक समस्यांवर मार्गदर्शन व मदत मिळवण्यासाठी असलेले सुरक्षित आणि विश्वासार्ह ठिकाण.येथे मानसिक तणाव,नैराश्य,चिंता यावर मार्गदर्शन केले जाते,तसेच कौटुंबिक व वैवाहिक समुपदेशन दिले जाते. मुलांचे व किशोरवयीन समुपदेशन, तसेच महिलांसाठी कौटुंबिक हिंसा किंवा छळ यांसारख्या संवेदनशील विषयांवर विशेष समुपदेशनही येथे उपलब्ध आहे.

या केंद्रांचा मुख्य उद्देश म्हणजे अडचणीत सापडलेल्या महिलांना आणि कुटुंबांना योग्य सल्ला, मानसिक आधार आणि समस्यांवर सकारात्मक तोडगा देणे.अनेक वेळा छोट्या गैरसमजांमुळे वाढलेले वाद समुपदेशनाच्या माध्यमातून मिटवले जातात आणि कुटुंब पुन्हा एकत्र येते.त्यामुळे केवळ समस्या सोडवणेच नव्हे,तर नातेसंबंध जपणे आणि समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करणे हेही या केंद्रांचे ध्येय आहे.महिला व बालक,कुटुंबातील सदस्य तसेच मानसिक तणाव किंवा कोणत्याही प्रकारच्या समस्यांचा सामना करणारी कोणतीही व्यक्ती या केंद्रांचा लाभ घेऊ शकते.

एकूणच,गेल्या एका वर्षात समुपदेशन केंद्रांनी केवळ आकडेवारीत यश मिळवले नाही,तर अनेक कुटुंबांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणला आहे.कोणाच्यातरी डोळ्यातील अश्रू पुसत,तुटलेली नाती पुन्हा जोडत आणि नव्या आशेचा किरण देत ही केंद्रे समाजात माणुसकीची उब जपत आहेत.

## लोकसेवा हक्क अधिनियम कामगिरीचा आढावा:प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढण्याचे जिल्हाधिकारी यांचे निर्देश

धाराशिव (जिमाका)- जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली २१ एप्रिल सर्व विभाग प्रमुख (कजऊ) यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अनुप शेंगुलवार, उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे,जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह विविध विभागाचे कार्यालय प्रमुख यांची उपस्थिती होती.

यावेळी उपजिल्हाधिकारी श्रीमती.शेंडे यांनी लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत जिल्ह्यातील विविध विभागाने आतापर्यंत केलेल्या कामगिरीचा आढावा सादर केला.

या बैठकीचा मुख्य उद्देश ठढड झशीषेीारपलश ऊीहलेरीव तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम (RTS) अंतर्गत सेवांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेणे हा होता.बैठकीत RTS Performance Dashboard संदर्भात सर्व संबंधित विभागांचा सखोल आढावा घेण्यात आला.

सेवा वितरणाची गुणवत्ता आणि गती यावर विशेष भर देत प्रलंबित अर्जांची स्थिती तपासण्यात आली.नागरिकांना वेळेत सेवा मिळावी यासाठी कार्यक्षमतेत वाढ करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. प्रलंबित प्रकरणांबाबत गांभीर्याने विचार करून ती लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिल्या तसेच २८ एप्रिल रोजी 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिवस' साजरा करण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याचे निर्देशही देण्यात आले.ठढड अपील प्रक्रियेबाबतही मार्गदर्शन करत पारदर्शकता आणि वेळेत निपटारा सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला.

सर्व विभागांनी प्रलंबित अर्जांची यादी तयार करून तातडीने निकाली काढावी. सेवा वितरणाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी नियमित आढावा बैठक घेण्यात यावी.महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिवसाच्या निमित्ताने जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत.लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत अपील प्रक्रियेत पारदर्शकता व वेळेत निपटारा सुनिश्चित करावा.असे श्री.पुजार यांनी यावेळी सांगितले.या बैठकीत घेतलेल्या निर्णयांमुळे नागरिकांना शासकीय सेवा वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने मिळण्यास अधिक गती मिळणार आहे.

## लोकल ते ग्लोबल संकल्पना......

### अण्णासाहेब पाटील महामंडळाचा डिजिटल उपक्रम उद्योजकांसाठी ठरत आहे वरदान

धाराशिव (जिमाका) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत केवळ आर्थिक सहाय्य देण्यापुरतेच मर्यादित न राहता, लाभार्थ्यांना सक्षम उद्योजक बनविण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.याच अनुषंगाने डिजिटल प्रशिक्षण उपक्रम व Marketing Tab सारख्या आधुनिक सुविधांची अंमलबजावणी करून लाभार्थ्यांना व्यवसाय वृद्धीसाठी सर्वंकष पाठबळ देण्यात येत आहे.

व्यवसाय वर्धन (Marketing Tab) : स्थानिक उत्पादनांना डिजिटल बाजारपेठ. आजच्या स्पर्धात्मक युगात उत्पादन तयार करणे जितके महत्त्वाचे आहे,तितकेच ते योग्य ग्राहकांपर्यंत पोहोचवणेही आवश्यक आहे.अनेक लघुउद्योजकांकडे दर्जेदार उत्पादने असली तरी त्यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होत नाही.हीच समस्या दूर करण्यासाठी महामंडळाने आपल्या अधिकृत पोर्टलवर व्यवसाय वर्धन (Business Promotion) चरीज्ञशींळपस ढरल विकसित केला आहे. हा Marketing Tab प्रसिद्ध ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्स जसे की Flipkart, Amazon आणि IndiaMART यांच्या धर्तीवर तयार करण्यात आला आहे.या प्लॅटफॉर्मद्वारे लाभार्थ्यांना त्यांच्या उत्पादनांची माहिती, फोटो,किंमत,संपर्क तपशील व व्यवसायाचा पत्ता अपलोड करण्याची सुविधा मिळते.सध्या या प्लॅटफॉर्मवर २७ हजार ५०० पेक्षा अधिक व्यवसायांची नोंद करण्यात आली आहे.यामध्ये व्यवसाय श्रेणी,उपश्रेणी,महसुली विभाग,जिल्हा व तालुका याप्रमाणे सर्च सुविधा देण्यात आली असून,नागरिकांना या सुविधेचा वापर करून नजिकच्या महामंडळाच्या लाभार्थ्यांची माहिती शोधता येईल व त्यांच्या उत्पादनांचा व सेवांचा लाभ घेता येईल.

या माध्यमातून लोकल ते ग्लोबल ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न केला जात आहे.लहान व्यवसायांनाही महामंडळाच्या पोर्टलमार्फत व्यवसायाची मोठी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.तरी सर्व लाभार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.व्यवसाय वर्धन (Business Promotion) संदर्भात अधिक सहकार्यासाठी संबंधित जिल्हा समन्वयकांशी संपर्क साधावा.भविष्यात लाभार्थ्यांच्या मागणीनुसार Payment Gateway सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही महामंडळ प्रयत्नशील आहे.

**डिजिटल प्रशिक्षण :** यशस्वी व्यवसायाची पायाभरणी.कोणताही व्यवसाय यशस्वी होण्यासाठी केवळ भांडवल पुरेसे नसून, योग्य ज्ञान,कौशल्ये आणि बाजारपेठेची समज असणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक लाभार्थ्यांकडे व्यवसाय करण्याची इच्छा असली तरी त्यांना व्यवस्थापन, तांत्रिक माहिती,मार्केटिंग,ग्राहक हाताळणी,आर्थिक नियोजन आणि डिजिटल साधनांचा वापर याबाबत पुरेशी माहिती नसते.हीच गरज ओळखून महामंडळाने थशलळपरी, र्धीर्ढीलश आणि झेवलरीं यांच्या माध्यमातून विविध प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले आहेत.

यामध्ये व्यवसाय कसा सुरू करावा व वाढवावा,उत्पादनाची गुणवत्ता व ब्रँडिंग, डिजिटल मार्केटिंग व सोशल मीडियाचा वापर,ग्राहकांशी संवाद व विक्री कौशल्ये, आर्थिक नियोजन व नफा वाढविण्याचे मार्ग अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाते.तसेच विविध व्यवसायांबाबत तज्ञ व्यक्तींकडून तांत्रिक माहिती उपलब्ध करून दिली जाते. महामंडळाने आयोजित केलेल्या प्रशिक्षणांचे व्हिडिओ अधिकृत YouTube व Facebook चॅनेलवर उपलब्ध करून दिल्यामुळे लाभार्थ्यांना त्यांच्या सोयीच्या वेळेनुसार शिक्षण घेता येते.विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील उद्योजकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

DigiLocker समावेश : कागदपत्र पडताळणी अधिक सुलभ. महामंडळाने DigiLocker सेवा स्वतःच्या प्रणालीमध्ये समाविष्ट (integrate) केली आहे.त्यामुळे कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया अधिक सुलभ,वेगवान व विश्वासार्ह करण्यात आली आहे.भविष्यात MAHAAID व भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) Integration बाबतही कार्यवाही करण्यात येणार आहे.

एकूणच,अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचा हा डिजिटल उपक्रम लाभार्थ्यांना केवळ आर्थिक सहाय्य देण्यापुरता मर्यादित न राहता, त्यांना सक्षम,आत्मनिर्भर आणि स्पर्धात्मक उद्योजक बनविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

## जागतिक वसुंधरा दिन पोदार स्कूलमध्ये मोठ्या उत्साहात साजरा



धाराशिव (शेख अंजुम)-शहरातील पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव यांच्या वतीने स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक वसुंधरा दिन हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे मानवाच्या अस्तित्वाचा पाया म्हणजे वसुंधरा. आपल्या जीवनातील प्रत्येक श्वास, प्रत्येक थेंब पाणी आणि प्रत्येक अन्नकण हा या पृथ्वीच्या उदारतेचा परिणाम आहे. त्यामुळेच दरवर्षी २२ एप्रिल हा दिवस 'जागतिक वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो.

या दिनाचे औचित्य साधून इयत्ता साहावीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुरेख असे नियोजनबद्ध रेखाटन स्कूलमध्ये सादर केले. तसेच या कार्यक्रमाला संबोधित करत असताना स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांनी विद्यार्थ्यांनी सध्याच्या धकाधकीच्या युगामध्ये कशा पद्धतीने वसुंधरा जतन व तिचे संवर्धन केले पाहिजे हे त्यांनी आपल्या विचारातून मांडले. याचे संपूर्ण नियोजन इयत्ता सातवीचे वर्गशिक्षक गौरीशंकर पालसर यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य निलेश जाधव सर, कार्यक्रमाधिकारी सुप्रिया राही गुडे मॅडम, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा हाहाकार; वीज पडून एकाचा मृत्यू, नागरिकांनी सतर्क रहावे

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- जिल्ह्यात संध्याकाळपासून निसर्गाचा कोप पाहायला मिळाला आहे. अनेक भागांत वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीत वीज पडून एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटनाही समोर आली आहे.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, प्रशासनाने पुढील काही दिवसांसाठी हवामानाचा अंदाज वर्तवला आहे. येत्या काही दिवसांत पुन्हा वादळ, जोरदार वारा, पाऊस आणि गारपिटीची



शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, नागरिकांनी स्वतःची आणि कुटुंबाची योग्य ती काळजी घ्यावी, ज्या भागात शेतीचे किंवा मालमत्तेचे नुकसान झाले आहे, त्या ठिकाणी उद्या सकाळपासूनच पंचनामे करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. नुकसानीचा आढावा घेऊन पुढील कायदेशीर आणि शासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण केली जाईल. पुढील काही दिवस हवामान प्रतिकूल राहण्याची शक्यता आहे. नागरिकांनी विनाकारण बाहेर पडणे टाळावे आणि हवामान खात्याच्या सूचनांचे पालन करावे. आपत्तीच्या स्वतःची आणि कुटुंबातील सदस्यांची काळजी घ्यावी. अशा प्रकारच्या नैसर्गिक संकटात सर्वांनी जागरूक राहून सुरक्षित रहावे ही कळकळीचे विनंती आहे. आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केली अहि.

## अवकाळी पावसाचा कांद्याला फटका; दरात ७०० रुपये प्रति क्विंटल घसरण

परंडा(प्रतिनिधी)-परंडा तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. अवकाळी पावसामुळे आधीच बेजार झालेल्या शेतकऱ्यांच्या कांद्याला बाजारात कवडीमोल भाव मिळत असल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती पूर्णपणे कोलमडली आहे. सध्याच्या परिस्थितीनुसार १ किलो कांदा उत्पादनासाठी साधारण १५ ते २० रुपये खर्च येतो. मात्र त्याच कांद्याला बाजारात केवळ ५ ते ७ रुपये प्रतिकिलो इतकाच दर मिळत आहे. म्हणजेच एकरी कांदा उत्पादनाचा खर्च सुमारे दीड ते दोन लाख रुपये इतका होत असून, सध्याच्या बाजारभावानुसार एकरी उत्पन्न केवळ ३० ते ४० हजार रुपये मिळत आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी एकरी एक ते दीड लाख रुपयांच्या मोठ्या नुकसानीत आहेत. परिणामी कांदा उत्पादकांची आर्थिक स्थिती अत्यंत हालाखीची झाली आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने एकरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. कांदा हे जीवनावश्यक यादीत नसतानाही बाजारभाव थोडे वाढले की शासन निर्यातबंदी करून दर नियंत्रणात आणण्यासाठी तत्परता दाखवते. मात्र दर कोसळल्यानंतर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तशी तत्परता दिसत नाही, असा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. परंडा तालुक्यात सिंचन क्षेत्र वाढल्यामुळे मोठ्या प्रमाणात कांद्याची लागवड करून नगदी पीक घेतले जाते. मागील वर्षी विधानसभा निवडणुकीच्या काळात कांद्याला काहीसा दिलासादायक दर मिळाला होता. मात्र त्यानंतर दरात मोठी घसरण होऊन तो १००० ते १२०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत खाली आला. त्यातच अतिवृष्टीमुळे शिल्लक कांद्याचेही मोठे नुकसान झाले. पुरवठा कमी झाल्यामुळे उरलेल्या कांद्याला चांगला दर मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र ती अपेक्षाही फोल ठरली. १५ डिसेंबर २०२५ रोजी एक नंबर कांदा २७०५ ते ३५०० रुपये प्रति क्विंटल दराने विकला गेला. दोन नंबर कांद्याला २००० ते २७०० रुपये दर मिळाला, तर अपवादात्मक ४१ गोण्यांना ४००० रुपये दर मिळाला होता. मात्र अवघ्या दहा दिवसांतच दरात मोठी घसरण झालेली दिसून येत आहे. दर घसरणीचा मोठा फटका २५ डिसेंबर २०२५ रोजी दर १८०० ते २५०० रुपये प्रति क्विंटलवर आले. सध्या बाजारात कांद्याची आवक कमी असली तरीही दरात सातत्याने घसरण होत आहे. २९ जानेवारी २०२६ रोजी एक नंबर कांदा १३०० ते १७०० रुपये, दोन नंबर ९०५ ते १३०० रुपये, तर तीन नंबर कांदा १०० ते ९०० रुपये प्रति क्विंटल दराने विकला गेला.

सध्या मात्र कांद्याचे दर ५०० ते ७०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत खाली आले असून या घसरणीचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे.

## पोलिसांची जुगार विरोधी कारवाई

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान नळदुर्ग पोलीसांनी दि.२१.०४.२०२६ रोजी नळदुर्ग पोलीस ठाणे हद्दीत नळदुर्ग बस स्टॉपचे भिंतीलगत चिकन दुकानासमोर पत्राच्या शेडलगत छापा टाकला. यावेळी जमीर वय ३२ वर्षे, रा. इंदीरानगर नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव हे नळदुर्ग बसस्टॉपचे भिंतीलगत चिकन दुकानासमोर पत्राच्या शेडलगत टाईम बाजार मटका जुगाराचे साहित्या एकुण ३,७४० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले नळदुर्ग पो. ठाणेच्या पथकास आढळले.

यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भारताची भुमिका मजबुत..

दहशदवादी विरोधात भारताची भुमिका मजबुत आहे. देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी सुत्रे हाती घेतल्यापासून दहशदवाद कमी झाला आहे. देशात विविध ठिकाणी होणारे बॉम्बस्फोटाच्या घटना होत नाहीत. देशात घुसखोरी होत होती ती कमी झाली आहे. एकमेव जम्मू काश्मीरच्या सीमावर्ती डोंगराळ व घनदाट जंगलातून होणारी घुसखोरीचे प्रमाण कमी झाले आहे. मुळात अप्रिय घटना ह्या आपल्याच देशातील काही हस्तक, गद्दाराच्या मदतीने होतात ही बाब लपून राहीली नाही. सत्तापरिवर्तनच्या पुर्वीची काही घटना व संबंध पाहिले तर या बाबतीत भारताची स्थिती सध्याला समाधानाची आहे हे लक्षात येते, तरी काही अप्रिय घटना घडतात. पहलगाम येथील भीषण दहशतवादी हल्ल्याला एक वर्ष पूर्ण होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. वर्षभरापूर्वी काश्मिरच्या पहलगाम खोऱ्यात भीषण दहशतवादी हल्ला झाला. दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घातल्या. या हल्ल्यात देशभरातील २६ पर्यटक मृत झाले. हा दिवस भारतासाठी काळा दिवस असून या हल्ल्याला एक वर्ष होत असताना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया पोस्ट केली आहे. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी पहलगाम हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली वाहिली आणि त्यांचे बलिदान कधीही विसरले जाणार नाही, असे त्यांनी म्हटले की, गेल्या वर्षी आजच्याच दिवशी पहलगाममध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या निष्पाप जीवांचे मी स्मरण करतो. त्यांना कधीही विसरले जाणार नाही. या दु:खातून सावरणाऱ्या शोकाकुल कुटुंबांच्या पाठीशी माझ्या सहवेदना आहेत. पंतप्रधान पुढे म्हणाले, एक राष्ट्र म्हणून आम्ही या दु:खात आणि संकल्पात एकत्र उभे आहोत. भारत कोणत्याही प्रकारच्या दहशतवादासमोर कधीही झुकणार नाही. दहशतवाद्यांचे क्रूर मनसुबे कधीही यशस्वी होणार नाहीत. गेल्या वर्षी २२ एप्रिल रोजी दक्षिण काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ लोकांची हत्या केली होती, .यात प्रामुख्याने पर्यटकांचा समावेश होता. याला प्रत्युत्तर म्हणून भारताने ७ मे रोजी पहाटे लष्करी मोहीम सुरू केली आणि पाकिस्तान तसेच पाकव्याप्त काश्मीरमधील अनेक दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. या मोहिमेने दहशतवादी धमक्या मोडीत काढल्या, पुढील आक्रमकता रोखली आणि दहशतवादाविरुद्ध भारताच्या 'झिरो टॉलरन्स' धोरणाचा पुनरुच्चार केला. भारतीय लष्करानेही बुधवारी इशारा दिला की, राष्ट्राविरुद्धच्या कोणत्याही गैरकृत्याला निर्णायक प्रत्युत्तर दिले जाईल. भारताविरुद्धच्या कृत्यांना चोख प्रत्युत्तर नक्कीच दिले जाईल. न्याय मिळवून दिला जाईल, असे लष्कराच्या पोस्टमध्ये म्हटले आहे. या पोस्टमध्ये 'ऑपरेशन महादेव' चे एक छायाचित्र देखील जोडले होते, ज्यावर लाल रंगात ही केवळ वेळेची बाब होती. २२ एप्रिलच्या घटनेनंतर लगेचच सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेत दाचीगाम/महादेव रिजजवळील दुर्गम हिमालयीन प्रदेशात शोधमोहीम राबवण्यात आली. ९३ दिवसांच्या कालावधीत, सुरक्षा दलांनी ३०० चौरस किमीपेक्षा जास्त परिसर पिंजून काढला आणि अखेर तीन मुख्य दहशतवाद्यांचा शोध घेऊन त्यांना कंठस्नान घातले. असे यापुर्वी घटले नव्हते. भारताची भुमिका मवाळ होती. मजबुत असे धोरण राबविले नव्हते. यापुर्वीच्या सरकारने मतासाठी काही प्रकार केला हे उघड होते. देशात सतत बॉम्ब स्फोट होणे, मुंबईत अतिरेकी हल्ला, अशा ज्या घटना घडत होत्या त्याला जबाबदार कोण होते? सरकार जर जनतेची सुरक्षा करू शकत नसेल तर काय उपयोग? थोड्याच दिवसात सत्ता परिवर्तन झाले व भाजपाचे सरकार केंद्र स्थानी आहे. याचा परिणाम पाकिस्तान घाबरला. त्याला माहिती होते की, पंतप्रधान नरेंद्र मोदी कधी काय करतील हे सांगता येत नाही. ऑपरेशन सिंदूर यशस्वी करून दाखविले. बिळात लपलेले अतिरेकी शोधून कंठस्थान घातले. हे काम केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदीच करू शकतात. अजून ही काँग्रेसला आपले समजणारी मंडळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मत देत नाही. त्यांच्यासाठी कितीही केले तरी ते मोदी यांना शिव्या घालतात. त्यामुळे आज जी जम्मू काश्मीरात शांतता आहे ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे आहे. मुळात जम्मूकाश्मीरातील अनेकजन पाकिस्तानशी नाते संबंधी आहेत. त्यांना आश्रय देणारे आहेत. भारतात शोधले तर लपून बसलेले पाकिस्तानी सापडतील. जे भारतात विविध कामासाठी आले ते पाकिस्तानात परतले नाहीत. अशांचा शोध घेतला पाहिजे. वास्तविक भारत हा ढिला देश आहे. भारतातील राज्यकर्ते देशाप्रेमापेक्षा मतप्रेमी आहे. अशावृत्तीमुळे देश पोखरला जात आहे. मुळात आपल्यादेशातील नागरिकांत राष्ट्रप्रेमाचा अभाव आहे. याचाच लाभ धुर्तमंडळी घेतात. आतून देश पोखरला जात आहे हे माहिती नाही असे नाही. सध्याला देश विरोधी कारवाया ह्या देशात राहुन घडविल्या जात आहेत. भारतातील नातेसंबंध जोडून दिर्घकाळ राहुन आधारकार्ड, रेशनकार्ड काढून भारतीय नागरिक बनले आहेत. हेच त्रासदायक ठरणारे आहे. पहलगामची घटना घडली तरी भारतीयांचे डोळे उघडले नाहीत. भारतीय मंडळी आपल्याला काय करायाचे या धुंदीत आहेत. नाशिक मधील घटनेवरून रक्त खवळले पाहिजे. जे रक्त थंड काय अतिथंड आहे ते खवळणार कसे? त्यामुळे तरी पहलगाम मधील घटनेनंतर कोणती ठोस भुमिका सरकारने त्यापेक्षा नागरिकांनी घेतली आहे. याचा विचार कधी थंड डोक्यांनी केला का? मुळात जम्मूकाश्मीरमध्ये किती भारतीयांवर गोळ्या घातल्या याचा कधी विचार केला का? मुळात भारतीय जवानावर गोळ्या घातल्या, तरणेबांड जवानांस ठार मारले, भारतीय मंडळी किती पेटून उठली? मुळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूर ही ठोस कारवाई राबविली म्हणून पाकिस्तान शांत आहे. आता तर अमेरिकेशी मैत्री करून भारतावर दडपन आणण्याची शक्यता नाकारता येत नाही. पंतप्रधानांनी पहलगामच्या घटनेची आठवण ठेवून श्रद्धांजली अर्पन केली आहे. भारतीयांनी सुद्धा याघटनेची आठवण ठेवून दहशदवाद पोसणाऱ्या देशाला अद्दल घडविली पाहिजे. त्याचे पिलावले जर भारतात असतील तर त्यांना शोधून पाकिस्तानात पाठवावे लागेल. देशाची सुरक्षतेची जबाबदारी सर्व नागरिकांवर आहे हे सतत लक्षात ठेवले पाहिजे.

## लातूरचे नूतन जिल्हाधिकारी डॉ.भारत बास्टेवाड यांची जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांनी घेतली सदिच्छा भेट

### जिल्ह्याच्या विकासावर केली सविस्तर चर्चा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी आपल्या सहकाऱ्यांसह लातूरचे नूतन जिल्हाधिकारी डॉ.भारत बास्टेवाड यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी जिल्ह्यातील विकासाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या चर्चेत जिल्ह्यातील बॅरेजेसचे जुने झालेले गेट दुरुस्ती करणे, शेतकऱ्यांना पिकविमा तत्परतेने मिळणे, पिण्याच्या पाण्याची वितरण व्यवस्था अधिक सक्षम करणे तसेच तुती लागवडीसंदर्भातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आदी विषयांवर सकारात्मक संवाद झाला. विशेषतः शेतकरी हिताच्या विविध योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल, यावरही सखोल चर्चा करण्यात आली.

डॉ. भारत बास्टेवाड हे अनुभवी व कर्तव्यदक्ष अधिकारी असून, त्यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला.

यावेळी चर्चेदरम्यान लोकनेते विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्ह्यात उभारलेल्या बंधाऱ्यांच्या निर्मितीची आठवणही काढण्यात आली. त्या बंधाऱ्यांच्या उभारणीत संबंधित विभागाचे अधिकारी म्हणून डॉ. बास्टेवाड यांनी दिलेल्या मोलाच्या योगदानाचा उल्लेख करण्यात आला.

लातूर जिल्हाधिकारी म्हणून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना आपले संपूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी दिली.

या भेटीदरम्यान काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे, शहराध्यक्ष किरण जाधव,जिल्हा परिषद माजी अध्यक्ष संतोष देशमुख,रेणाचे चेअरमन अनंतराव ठाकूर (देशमुख),जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, रेणापूर तालुकाध्यक्ष प्रमोद कापसे,लातूर तालुकाध्यक्ष उमेश बेद्रे, जिल्हा परिषद गटनेत्या आशाताई भिसे,लातूर पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले,उपसभापती महेश चव्हाण,रेणापुर शहर अध्यक्ष नितीन माटेगावकर,रेणाचे व्हा चेअरमन प्रविण पाटील,रेणापूर बाजार समिती सभापती उमाकांत खलंग्रे,रेणापूर बाजार समिती उपसभापती शेषराव हाके पाटील, संचालक प्रकाश सुर्यवंशी,जि प सदस्य दत्तात्रय टेकाळे, गंगासिंह कदम,जी.प सदस्य भागीरथी पाटील,पंचायत समिती सदस्य दिपाली आदमाने, नगरसेवक सचिन मोटेगावकर,पंचायत समिती सदस्य गुरुनाथ गवळी किसान सेलचे अध्यक्ष रामानंद जाधव,जीप सदस्य श्रीकांत माने,दत्ता शिंदे,रेणापुर पंचायत समिती सदस्य प्रविण माने,सरपंच सुहास कदम,पप्पू देशमुख,नाना जाधव,मनोज कदम,आदींची उपस्थिती होती.

## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज, लातूर महाविद्यालयास श्री जगन्नाथ (अप्पा) शिंदे यांची भेट

**लातूर/प्रतिनिधी :** फार्मसी क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व आणि अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे तथा, महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल (मुंबई) आणि फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (नवी दिल्ली) चे कार्यकारी सदस्य श्री जगन्नाथ (अप्पा) शिंदे यांनी चन्नबसवेश्र्वर फार्मसी कॉलेज ला सदिच्छा भेट दिली.

भेटीदरम्यान त्यांनी महाविद्यालयाचा परिसर, प्रयोगशाळा, वर्गखोल्या आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला. प्राचार्य डॉ. संजय एस. थोंटे यांनी त्यांना महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली, तसेच महाराष्ट्र राज्य औषध परिषदेच्या संयुक्त उपक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेले Pharmacist Refresher Courses, Smart Pharmacist Course 2.0, Continuing Education Programs (CEPs) इत्यादी जे लातूर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबवले जातात याचीही माहिती प्राचार्यांनी दिली.

त्यांनी महाविद्यालयाच्या उत्कृष्ट पायाभूत सुविधा, प्रयोगशाळांची आधुनिकता आणि विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षण पद्धतीचे कौतुक केले. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया च्या नवीन अभ्यास क्रमातून भावी फार्मासिस्ट हा औषधांचा तज्ञ म्हणून बाहेर पडणार आहे, त्यासाठी महाविद्यालयाकडून राबविण्यात येत असलेले नवनवीन उपक्रम व सुविधांचा आढावा घेऊन त्यावर सखोल चर्चा प्राचार्य व प्राध्यापक मंडळींनी केली. डी. फार्मसी अभ्यासक्रमाचा भाग असलेला भाग-३ ज्यात औषधी दुकाने, हॉस्पिटल, व औषधी कारख्यान्यात प्रशिक्षण घेणे आवशयक आहे, त्याकरिता विकसित केलेल्या मॉड्यूल बाबत विशेष कौतूक केले आणि राज्य औषधी परिषद तथा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन च्या माध्यमातून हे मॉड्यूल राज्य व देश पातळीवर राबविण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प केला.

भेटी दरम्यान श्री शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. त्यांनी फार्मासिस्ट म्हणून समाजातील जबाबदारी आणि नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच राज्यभरातील फार्मसी संस्थांनी अशा प्रशिक्षण उपक्रमांचा अवलंब करावा, असे आवाहन करून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

श्री शिंदे यांनी भाग III प्रॅक्टिकल ट्रेनिंग मॅन्युअलच्या दोन प्रती सोबत घेतल्या, जेणेकरून त्या महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल आणि फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया येथे सादर करून विचारात घेता येतील. त्यांनी सांगितले की अशा शैक्षणिक उपक्रमांमुळे फार्मासिस्ट प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढेल आणि विद्यार्थ्यांना व्यावसायिक क्षेत्रात अधिक सक्षम बनवेल.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय एस. थोंटे यांनी जगन्नाथ (अप्पा) शिंदे यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. लातूर केमिस्ट असोसिएशनचे उपाध्यक्ष अरुण सोमानी सदस्य अंकुश भोसले, प्रकाश रेड्डी तसेच महाराष्ट्र राज्य औषध परिषदेचे समन्वयक श्री. नागेश स्वामी, महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. नागोबा एस. एन., प्रा. राजुरकर आर. एम., प्रा. सुगावे आर. व्ही., प्रा. डॉ. पंचभाई व्ही. बी, प्रा. डॉ. कौडेवार डी. आर., प्रा. डॉ. राम साखरे, प्रा. डॉ. शेख एन. एस., प्रा. सारिका झिंगाडे, प्रा. प्रतिभा ठावरे, प्रा. रिशा वाले , प्रा. प्रशांत बनसोडे, प्रा रोहित कोंबडे, प्रशासकीय कर्मचारी विशाल निलंगेकर, अरुण स्वामी, सिद्धार्थ बिडवे, नागेश स्वामी, सूकराज गरगट्टे, लक्ष्मण सूर्यवंशी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## शाही थाटात पार पडला साखरपुड्याचा भव्य सोहळा !



**मुंबई/प्रतिनिधी :** मसालाकिंग धनंजय दातार आणि त्यांच्या पत्नी वंदना दातार यांनी आपल्या सुपुत्र रोहित दातार आणि सानिया नरवाडे यांच्या साखरपुड्याचा भव्य सोहळा मुंबईतील प्रतिष्ठित ताज लँड्स एंड येथे मोठ्या थाटामाटात आयोजित केला. या देखण्या संध्याकाळी कुटुंबीय, मित्रमंडळी आणि शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित राहून नव्या आयुष्याच्या प्रवासाला सुरुवात करणाऱ्या या जोडप्यावर आशीर्वादांचा वर्षाव केला.

या सोहळ्यात एक अप्रतिम संगीतमय कार्यक्रम रंगला, ज्यामध्ये प्रसिद्ध गायक सुदेश भोसले आणि वैशाली सामंत यांच्या सादरीकरणांनी वातावरणात उत्साह आणि ऊर्जा भरली. या संगीतसंध्येला आणखी रंगत आणली ती सिद्धांत भोसले यांच्या मधुर आवाजाने, ज्यांनी आपल्या गायनाने उपस्थितांची मनं जिंकली. या खास प्रसंगी वराची आई वंदना दातार यांनी तालावर नृत्य करत आपल्या आनंदाची आणि उत्साहाची सुंदर अभिव्यक्ती केली, हा क्षण सर्वांसाठी खास ठरला.

कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेत्री 'नटरंग' फ ेम सोनाली कुलकर्णी आणि मानसी नाईक यांच्या जोशपूर्ण नृत्य सादरीकरणांनी रंगत आणखी वाढवली.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ चांदेकर यांनी केले, त्यांच्या उत्साही आणि आकर्षक उपस्थितीमुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.

या सोहळ्याचे खास आकर्षण ठरले ते अनोखे रिंग सेरेमनी, जिथे साखरपुड्याच्या अंगठ्या ड्रोनद्वारे खाली आणण्यात आल्या, ज्यामुळे पारंपरिक विधींना आधुनिकतेचा एक सुंदर आणि अनोखा स्पर्श मिळाला आणि सर्व उपस्थित मंत्रमुग्ध झाले.


याप्रसंगी धनंजय दातार म्हणाले, ''या शुभदिनी आम्ही या जोडप्याला आयुष्यभर एकत्र राहण्याच्या, आशीर्वादांच्या आणि आनंदाच्या असंख्य क्षणांच्या हार्दिक शुभेच्छा देतो.''

सानियाचे आई-वडील सीमा आणि कुमार नरवाडे यांनी कुटुंबीय आणि मित्रमंडळींचे मनापासून स्वागत केले आणि हा आनंदाचा क्षण उत्साहाने साजरा केला. रोहितचा मोठा भाऊ हृषिकेश दातार आणि त्यांची पत्नी आकांक्षा यांनीही उपस्थितांचे प्रेमपूर्वक स्वागत करत या सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतला.

संध्याकाळी शेवटी पाहुण्यांनी स्वादिष्ट आणि खास खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत, प्रेम, आनंद आणि एकत्रतेने भरलेला हा सोहळा अविस्मरणीय ठरवला.

## वाचनसंस्कृतीचा दीपस्तंभ : 'जागतिक पुस्तक दिन

२३ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक पुस्तक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस केवळ पुस्तकांचा गौरव करण्यापुरता मर्यादित नसून तो ज्ञान, विचार, संस्कृती आणि सर्जनशीलतेच्या जतनाचा व प्रसाराचा उत्सव आहे. मानवी सभ्यतेच्या इतिहासात पुस्तकांनी जे योगदान दिले आहे, ते अनमोल आहे. शब्दांच्या माध्यमातून माणसाने आपल्या अनुभवांना, विचारांना, ज्ञानाला आणि संस्कृतीला आकार दिला आणि ते पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवले. त्यामुळे पुस्तक हे केवळ अक्षरांचा संच नसून ते मानवी उत्क्रांतीचे आणि सामाजिक प्रगतीचे सशक्त साधन आहे. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला या महत्त्वाची जाणीव करून देणारा आणि वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी देणारा एक प्रेरणादायी दिवस आहे.




मानवाच्या आरंभीच्या काळात ज्ञानाची देवाणघेवाण तोंडी परंपरेतून होत असे. कथा, लोकपरंपरा, धार्मिक विधी आणि जीवनातील अनुभव यांद्वारे ज्ञान पिढ्यान्पिढ्या पुढे जात होते. परंतु लिपीचा शोध लागल्यानंतर ज्ञानाचे लिखित स्वरूपात जतन होऊ लागले आणि तेच पुढे पुस्तकांच्या स्वरूपात विकसित झाले. भारतीय संस्कृतीमध्ये वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, बौद्ध त्रिपिटक, जैन आगम, संत साहित्य आणि विविध तत्त्वज्ञानपर ग्रंथांनी ज्ञानपरंपरेचा भक्कम पाया घातला. या ग्रंथांमध्ये केवळ धार्मिक किंवा तात्त्विक विचार नाहीत, तर मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान, नैतिक मूल्ये, सामाजिक संरचना आणि जीवनपद्धती यांचा सखोल अभ्यास आढळतो. त्यामुळे पुस्तक हे केवळ ज्ञानाचे साधन नसून ते जीवनाला दिशा देणारे मार्गदर्शक ठरते.

वाचन ही एक सवय नसून ती एक संस्कारप्रक्रिया आहे. वाचनामुळे व्यक्तीच्या विचारशक्तीला चालना मिळते, कल्पनाशक्ती विस्तारते आणि विवेकबुद्धी विकसित होते. एखादे पुस्तक वाचताना वाचक त्या लेखकाच्या अनुभवविश्वात प्रवेश करतो आणि विविध भावविश्वांचा अनुभव घेतो. त्यामुळे वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून ती आत्मविकासाची एक सर्जनशील यात्रा आहे. वाचनामुळे व्यक्ती अधिक संवेदनशील, विचारशील आणि समंजस बनते. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा विचारशील व्यक्तींची आवश्यकता असते.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात माहितीचा स्फोट झाला आहे. मोबाईल, इंटरनेट, सामाजिक माध्यमे यांमुळे माहिती सहज उपलब्ध झाली आहे. परंतु या माहितीच्या महासागरात सखोल ज्ञान हरवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माहिती ही तात्पुरती आणि तुकड्यांमध्ये मिळणारी असते, तर ज्ञान हे सुसंगत, सखोल आणि टिकाऊ असते. पुस्तक वाचनामुळेच हे सखोल ज्ञान आत्मसात करता येते. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करत असतानाही पुस्तक वाचनाची सवय जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. डिजिटल माध्यमे ही पूरक साधने असू शकतात, परंतु त्यांची जागा पुस्तक घेऊ शकत नाही.

विद्यार्थी जीवनात वाचनाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. पाठ्यपुस्तकांपुरते शिक्षण मर्यादित ठेवणे योग्य नाही. विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, चरित्रे, विज्ञान, इतिहास, साहित्य, समाजशास्त्र, अर्थशास्त्र अशा विविध क्षेत्रांतील पुस्तके वाचल्यास विद्यार्थ्यांची ज्ञानाची व्याप्ती वाढते. वाचनामुळे भाषिक कौशल्ये विकसित होतात, शब्दसंपदा वाढते आणि विचार मांडण्याची क्षमता सुधारते. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर वाचनसंस्कृती रुजवणे अत्यंत गरजेचे आहे.

समाजाच्या दृष्टीने पाहिले, तर वाचनसंस्कृती असलेला समाज अधिक प्रगत आणि जागरूक असतो. वाचनामुळे नागरिकांमध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांविषयी जाणीव निर्माण होते. पुस्तकांच्या माध्यमातूनच अनेक सामाजिक चळवळींना बळ मिळाले आहे. समाजसुधारकांनी आपल्या लेखनातून समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञानाविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. त्यामुळे वाचनसंस्कृती ही लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

मराठी साहित्य परंपरा अत्यंत समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, पु. ल. देशपांडे यांसारख्या महान लेखकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजाला जागृत केले. त्यांच्या लेखनातून सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकला गेला आणि परिवर्तनाची प्रेरणा दिली गेली. साहित्य हे समाजाचे आरसे आहे, असे म्हटले जाते आणि ते खरेही आहे.

आजच्या काळात वाचनसंस्कृतीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर, वेळेअभावी वाचनाकडे दुर्लक्ष, पुस्तकांच्या वाढत्या किंमती, तसेच ग्रंथालयांची अपुरी संख्या ही काही प्रमुख कारणे आहेत. विशेषतः लहान मुलांमध्ये वाचनाची सवय कमी होत चालल्याचे दिसते. त्यामुळे बालपणापासूनच वाचनाची आवड निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी मुलांना पुस्तकांची ओळख करून द्यावी आणि त्यांच्यासोबत वाचनाचा आनंद घ्यावा.

ग्रंथालये ही वाचनसंस्कृतीची केंद्रे आहेत. ग्रामीण भागात ग्रंथालयांची संख्या वाढवणे आणि त्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी वाचनालये उभारून वाचनसंस्कृतीला चालना देता येऊ शकते. तसेच, पुस्तक प्रदर्शन, वाचन स्पर्धा, लेखक-वाचक संवाद, कथाकथन कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांद्वारे वाचनाची आवड वाढवता येते.

'जागतिक पुस्तक दिन' साजरा करण्यामागील उद्देश म्हणजे वाचनसंस्कृतीला चालना देणे आणि लेखकांच्या योगदानाचा गौरव करणे हा आहे. या दिवशी विविध ठिकाणी पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक कार्यक्रम, चर्चासत्रे आणि व्याख्याने आयोजित केली जातात. यामुळे लोकांमध्ये पुस्तकांविषयी जागरूकता निर्माण होते. तंत्रज्ञानाच्या युगात ई-पुस्तके आणि ऑडिओ पुस्तके यांचा वापर वाढत आहे. ही साधने वाचनासाठी उपयुक्त ठरत असली, तरी पारंपरिक पुस्तकांचे महत्त्व अजूनही कायम आहे. पुस्तक हातात घेऊन वाचण्याचा अनुभव वेगळाच असतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाही पारंपरिक वाचनसंस्कृती जपणे आवश्यक आहे. वाचनसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये आणि शासन यांनी वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. 'दर महिन्याला एक पुस्तक' अशी संकल्पना राबवता येईल.

शेवटी असे म्हणता येईल की, पुस्तक हे मानवाच्या प्रगतीचे खरे साधन आहे. ज्ञान, संस्कार आणि विचार यांचे संगम म्हणजे पुस्तक. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला वाचनाची प्रेरणा देणारा दिवस आहे. आजच्या युगात सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने वाचनाची सवय जोपासून ज्ञानसमृद्ध समाजाच्या निर्मितीत आपला वाटा उचलावा, हीच या दिवसाची खरी शिकवण आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

भूराजकीय समीकरणे आणि स्वतःचे व्यावसायिक हित, यासाठी ट्रम्प यांच्याकडून मुनीर प्रतिष्ठित ठरले. इराणमधील कट्टरतावादी गटांशी मुनीर यांचा सलोखा असल्याने ते जोखीम आहेत, असा अमेरिकी यंत्रणांचा अहवाल आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर यांच्या चिथावणीतून आणि पाठबळातून झालेल्या या हल्ल्याची जखम आज देखील भारतीयांच्या मनात ताजी आहे. 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानला धूळ चारण्यात आली, तरीही या हल्ल्यातील बळींना पूर्ण न्याय मिळाला नाही, ही सर्वसामान्य नागरिकांची कमी-अधिक भावना आहे. याची अनेक कारणे आहेत. सर्वांत प्रमुख कारण पाकिस्तानचे तथाकथित फील्ड मार्शल असीम मुनीर. ज्या ठिकाणी पाकिस्तानची अण्वस्त्रे असल्याचे सांगितले जाते तो नूरखान तळ भारतीय हवाई दलाने उद्ध्वस्त केला. पाकिस्तानातील दहशतवादी तळांसह तेथील हवाई तळ लक्ष्य करून भारताने त्या देशाची संपूर्ण हवाई संरक्षण यंत्रणाच निकामी केली. शहाणपण शाबूत असलेला दुसरा देश असता, तर लष्करप्रमुखाची गच्छंती झाली असती. त्या उलट पराभूत लष्करप्रमुखाने स्वतःला 'फील्ड मार्शल' किताब घोषित केला. गुरूच्या पावलावर शिष्य पाऊल टाकतो; पण या मुनीर यांच्या गुरूने, अर्थात डोनाल्ड ट्रम्प यांनी शांततेसाठीच्या नोबेल पुरस्काराचे पदक स्वतःकडे हिसकावून घेतले! आज इराणकडून जगाला असलेल्या अण्वस्त्रांच्या तथाकथित धोक्यावर अमेरिका गळे काढत आहे; पण आमच्यावर हल्ला झाल्यास अणुयुद्ध होऊन निम्म्या जगाचा नाश होईल, हे मुनीर यांचे अमेरिकेच्या भूमीवर बरळणे ट्रम्प यांना चालते! दहशतवादाबद्दलची बड्या देशांची दुटप्पी भूमिकाच

# न विसरणारा पहलगामचा धडा



निरपराधांच्या बळींचे सत्र कायम राहायला कारण ठरली आहे.

**पाकिस्तानची मुजोरी कायम**

ऑपरेशन सिंदूर लष्करीदृष्ट्या यशस्वी झाले; पण पाकिस्तानला जागतिक स्तरावर एकटे पाडण्याचे प्रयत्न फार यशस्वी झालेले नाहीत. त्याचबरोबर दहशतवाद्यांना, त्यांच्या गटांना साहाय्य करणार्या स्थानिक घटकांना शोधण्यावर देखील मर्यादा येतात. पहलगाम हल्ल्यानंतर घातक रसायनांचा वापर करून भारतात सामुदायिक हत्याकांड घडविण्याचे कारस्थान केवळ तपास यंत्रणांच्या दक्षतेमुळे उघड होऊ शकले. राजधानी दिल्लीसह लखनौ, अहमदाबादमधील ठिकाणांची या दहशतवाद्यांनी पाहणी केली होती. सीमेवर सावधगिरी आहे, याबद्दल दुमत नसले तरी या प्रकरणातील टोळीने राजस्तानातील हनुमानगड येथून शस्त्रे खरेदी केली होती आणि ती पाकिस्तानने ड्रोनमार्फत पाठवली होती, हे त्यावेळी उघड झाले. लाल किल्लयाजवळ त्याच सुमारास स्फोट घडविण्यात आला. त्यावेळी फरिदाबादमधून ३६० किलो स्फोटके जप्त करण्यात आली होती. विशेष म्हणजे अनेक डॉक्टरांचा या सर्व कारस्थानात सहभाग होता. धार्मिक विद्वेष टोकाला जाईल, या पद्धतीचा अतिरेक होता कामा नये. तसे वातावरण सामाजिक सौहार्दाला केवळ नख लावत नाही, तर शत्रू देशांना येथे हस्तक उपलब्ध होण्यास अनुकूल ठरते. हा धोका समंजस समाजाने लक्षात घेतला पाहिजे. शत्रु देशाला अपेक्षित असलेली दुफळी कधीही निर्माण होऊ न देणे आणि सर्व समाज घटकांना एकत्र पुढे नेत देशाची प्रगती राखणे, हाच पर्याय आपल्यासमोर आहे. आर्थिक आणि लष्करी महासत्ता होणे हे भारताचे स्वप्न आहे. ते साध्य करण्याची क्षमता देशवासीयांमध्ये आहे, सैन्य दलाकडे कल्पकतेसह आधुनिक संरक्षण प्रणाली आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी पाकिस्तानचे ड्रोन सातत्याने सीमेपार येत असताना हवाई दलाने ते सर्व हल्ले परतवून लावले. अलीकडेच इराणसारख्या संरक्षण सामर्थ्याच्या बाबतीत उण्या मानल्या जाणार्या देशाने इस्रायलवर केलेल्या हल्ल्यांपैकी अनेक हल्ले मोठा विनाश करणारे ठरले. हवाई संरक्षण यंत्रणेच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. अशावेळी अनेकांना 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाची आठवण येणे स्वाभाविक. आयात शुल्कासंदर्भातील गोंधळ, आखाती युद्धामुळे तेल वाहतुकीवर झालेला परिणाम ही ताजी आव्हाने झाली. अंतर्गत सुरक्षिततेच्या आव्हानाशी आपण वर्षानुवर्षे झुंजत आहोत. धार्मिक ध्रुवीकरणाला दूर ठेवणे आणि त्याचवेळी भ्रामक धार्मिक कल्पनांच्या आणि आर्थिक आमिषाच्या आहारी जाऊन भारतीय जनजीवनाला धोका निर्माण करणार्या



## निरोगी आरोग्यासाठी

निरोगी राहण्यासाठी समतोल आहार, नियमित व्यायाम, पुरेसे पाणी आणि पुरेशी झोप (७-८ तास) आवश्यक आहे १, ९. रोजच्या आहारात प्रथिने, भाज्या आणि फळांचा समावेश करा, तसेच जंक फूड आणि तळलेले पदार्थ टाळा ४, ५. दिवसभरात ६-८ ग्लास पाणी पिणे, नियमित चालणे किंवा योगासन करणे शरीराला सुदृढ ठेवते १, १०. मानसिक आरोग्यासाठी तणावमुक्त राहणे आणि सकारात्मक विचार करणे महत्त्वाचे आहे

## यो-गाचे



योगासनांपुरताच मर्यादित आहे असा बऱ्याच लोकांचा गैरसमज आहे. कारण त्याचे शारीरिक फायदे सहज लक्षात येतात; परंतु प्रत्यक्षात शरीर, मन आणि श्वासोच्छ्वास यांच्या संयोगमुळे अगणित फायदे होतात. मन, शरीर आणि श्वास यांचे संतुलन राखल्याने जीवनप्रवास शांत, आनंदी आणि सर्वार्थाने सफल होतो.नियमित योगामुळे सर्वात महत्त्वाचे दहा फायदे --शारीरिक स्वास्थ्य तर पाहिजेच, पण त्या बरोबर मानसिक आणि भावनिक स्वास्थ्य राहिलं पाहिजे. आनंद, प्रेम आणि उत्साह हे तुमच्या जीवनात उत्स्फूर्तपणे व्यक्त होत असतील तर त्याला खरी आरोग्य संपन्नता म्हणता येईल. त्यासाठी आसने, प्राणायाम (श्वासोच्छ्वासाच्या लयी) आणि ध्यान धारणा या गोष्टी आपल्या उपयोगी पडतात.-वजन कमी करण्यासाठीही योगाचा फायदा होतो. सूर्य नमस्कार, कपालभाती आणि प्राणायाम या योगिक क्रियांनी वजन कमी होते योगाच्या सहाय्याने वजन कमी करा. त्याचप्रमाणे रोज नियमित योगाचा सराव केल्याने आणि योग्य आहार घेतल्याने सुद्धा वजन नियंत्रणात राहायला मदत होते.

-ताणतणावापासून मुक्ती- आपल्या मनात आणि शरीरात साठून राहणाऱ्या ताणतणावांचा निचरा करण्यासाठी योगाचा काही मिनिटांचा दैनंदिन सराव पुरेसा असतो. योगासने, प्राणायाम आणि ध्यान धारणा ही सर्व ताण तणाव नाहीशी करणारी प्रभावी तंत्रे आहेत. योगाच्या सरावाने शरीरातील विष द्रव्ये आणि ताण तणाव शरीराबाहेर टाकली जातात.

-अंतर्यामी शांतता-सगळ्यांनाच एखाद्या शांत, प्रसन्न आणि निसर्गरम्य ठिकाणी जायला आवडते. मात्र आपल्याला हवी असणारी शांती ही आपल्यामध्येच वसलेली आहे. या शांतीची अनुभूती घेण्यासाठी रोजच्या धकाधकीच्या कार्यक्रमातून थोडा वेळ काढून रोज योग आणि ध्यान केल्याने बरेच फायदे मिळतात. अस्वस्थ झालेल्या मनाला काबूत आणण्यासाठी योगासारखा दुसरा उपाय नाही.-रोगप्रतिकारक शक्तीत वाढ-शरीर, मन आणि आत्मा या तिघांचे मिळून एकसंघ अशी आपली यंत्रणा असते. त्यामुळे शारीरिक अस्वस्थपणाचे पडसाद जसे मनावर आघात करतात तसेच मानसिक अस्वास्थ्याचे परिणाम शरीरात रोगाच्या रूपाने प्रकट होतात. योगामुळे निरनिराळ्या अवयवांचे मर्दन केले जाते आणि त्यांचे स्नायू बळकट होतात. श्वसनाच्या वेगवेगळ्या तंत्रांमुळे आणि ध्यान धारणेमुळे शरीरात साठलेला ताण तणाव निघून जातो आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते.-सजगतेत वाढ-मन हे सतत भूतकाळ आणि भविष्यकाळ यात झोके घेत असते. वर्तमानकाळात मात्र ते कधीच राहात नाही. आपल्यातली सजगता वाढल्याने मनाचे हे लक्षण आपल्या सहज लक्षात येते आणि त्यावर वेळीच उपाय योजून आपण ताणतणावातून मुक्त होऊ शकतो आणि मनाला शांत करू शकतो. योग आणि प्राणायामांच्या मदतीने आपल्यातली सजगता वाढते. सजगता वाढल्याने इकडे तिकडे धावणाऱ्या मनाला आपण सतत वर्तमान क्षणात आणू शकतो. तसे केल्याने ते आनंदी आणि एकाग्र बनते.

-नाते संबंधात सुधारणा- तुमचा जोडीदार, आई-वडील, मित्र किंवा तुमच्या लाडक्या व्यक्ती या सगळ्यांशी असेलेले नातेसंबंध योगामुळे सुधार-तात. तणावमुक्त, आनंदी आणि समाधानी मन नात्यांसारख्या संवेदनशील संबंधात फार उपयोगी पडते. योग आणि ध्यान धारणेमुळे मन सतत आनंदी, प्रसन्न आणि शांत राहते. त्याचा उपयोग आपल्या जवळच्या लोकांशी चांगले संबंध प्रस्थापित करण्यासाठी होतो.

-ऊर्जा वाढते- दिवसभराच्या कामाच्या धावपळीमुळे शेवटी तुम्हाला गळून गेल्यासारखे वाटते कां? सतत दिवसभर काम करत राहिल्याने तुम्ही पार थकून जाता. तुमच्यात काही त्राण उरत नाही; परंतु रोज काही मिनिटे नियमित योगाचा सराव केल्याने तुम्ही दिवसभर ताजेतवाने आणि उत्साही राहता. दिवसभराच्या कामाच्या रगाड्यातून तुम्ही मध्येच दहा मिनिटांचा वेळ काढून मार्गदर्शित ध्यान जरी केलेत तरी त्याचा तुम्हाला खूप फायदा होईल. तुमच्यात परत उत्साह संचारेल आणि हातात घेत-लेले काम तुम्ही तत्परतेने पुरे कराल.

-शरीराचा लवचिकपणा आणि शरीराची ठेवण सुधारते- तुमच्या दैनंदिन कार्यक्रमात तुम्ही जर योगाचा समावेश केलात तर शरीर सशक्त, चपळ आणि लवचिक बनेल. रोज न चुकता योगा केलात तर तुमच्या शरीराच्या स्नायूंना बळकटी येईल. तुमच्या शरीराची ठेवण सुधारेल. उभे राहताना, बसताना, झोपताना आणि चालताना त्यात एक प्रकारचा डौल येईल. चुकीच्या पद्धतीने बसण्या उठण्यामुळे पूर्वी जे अंग दुखायचे तसे ते दुखणार नाही.

-अंतर्ज्ञानात वाढ- तुमच्या अंतर्ज्ञानात वाढ करण्याची क्षमता योग आणि ध्यानधारणे मध्ये आहे. तशी वाढ झाल्यामुळे कोणती गोष्ट कधी, कुठे आणि कशी करायला हवी याचे अचूक निर्णय तुम्ही घेऊन त्याचे फायदे मिळवू शकता. योग केल्यामुळे हे बदल आपोआप होत असतात तुम्हाला फक्त याची अनुभूती घ्यायची असते.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

### पुरुषांमध्ये सहवासाची इच्छा कमी असण्याचे कारणे...



प्रणयक्रिडा हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्वाचा घटक असतो. यामुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. तसेच मानसिक संतुलनही उत्तम राहते. पण, काही पुरूषांना ही इच्छा कमी असते. यामागे अनेक कारणे आहेत. या कारणांमुळेच पुरुषांना सेक्सचा आनंद लुटता येत नाही. याचे मुख्य कारण खाली देण्यात येत आहे. **१) टेस्टोस्टेरोनची कमतरता**-हॉर्मोन्स टेस्टोस्टेरोनची कमतरता हे प्रणयाची इच्छा कमी होण्या मागचे प्रमुख कारण आहे. साधारण वयाच्या ४० व्या वर्षानंतर पुरूषांच्या रक्तामधील टेस्टोस्टेरोनची मात्रा कमी होणे ही सामान्य गोष्ट आहे. परंतु, काही पुरूषांना या समस्येचा लहान वयातच सामना करावा लागू शकतो. रक्तामधील टेस्टोस्टेरोनच्या कमरतेमुळे शरी-रात थकवा, अनिद्रा तसेच प्रणयाची इच्छा न होणे या समस्या उद्भवू शकतात.

## २ Joke विनोद


**चर्चेत राहण्यासाठी स्वतःची आत्मकथा लिहून टाकावी असा विचार माझ्या मनात आहे...!**



**शिक्षक : जगाच्या नकाशात नसलेले खंड कोणते?**

**विद्यार्थी : दोरखंड, श्रीखंड, वेखंड, आम्रखंड.**

## ३ Message संदेश



Aur bhi cheezain bahut see lut chuki hain dil ke sath
Ye btaya dosto ne ishq fr-mane ke baad;
Is liye kamre ki ek ek cheez "check" krta hu main"
Ek tere ane se pehle, ek tere jane ke baad"

## ४ Thought सुविचार




सत्तेपेक्षा सामर्थ्य महत्त्वाचे असते.

**संस्कृत सुभाषित**

**प्रमदा मदिरा लक्ष्मी विज्ञेया त्रिविधा सुरा।**
**दृष्टैन्मादयत्येका पीता चान्यातिसंचयात्।।**

मद्याची तीन रूपे आहेत. सुंदर स्त्री, मदिरा आणि संपत्ती ही मदिरेचीच तीन रूपे आहेत. सुंदर स्त्रीच्या दर्शनाने मद चढतो, मदिरेच्या प्राशनाने मद चढतो आणि धनाचा संचय केल्यामुळेही मद चढतो.

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. रोजच्या कार्यक्रमाची वही, डायरी
४. बहुमोल, किंमती
६. लकवा
१०. आशीर्वाद, पाठिंबा
११. कच्चे रेशीम धुताना निघणारा गाळसाळ, पारंब्यांचे झाड
१२. पडसे
१३. राजवाडा
१४. मुंज
१६. नशिबात लिहिलेले सुखदुःखाचे अनुभव
१७. लहान मुलगी
१९. शेवट
२०. टक्कर
२२. छोटे वादळ
२४. पशू
२५. हाकेला प्रतिसाद
२६. हिंम्मत, धैर्य
२९. गर्व, मस्ती
३१. अवघड, कष्टप्रद
३२. सूचना, चिथावणी
३४. गोमाता
३६. मल्ल
३७. बारीक झणझण
३८. मृत्यूदेवता
३९. वडील
४०. विठ्ठलाची पत्नी
४२. समशेर
४४. फायदा
४८. हजार किलो
५०. पहारेकरी
५४. मृत्यू, वेळ
५५. बहुतेक, आजूबाजूला
५८. मनाचा ओढा
५९. राखल्यास वाढणारी
६०. आकाश
६१. वाडा
६२. मृत्यू (हिंदी)
६३. अभिप्राय
६४. एक प्रश्नार्थक शब्द
६६. दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
६९. दुःख
७०. समुद्रकिनारे आणि काजूच्या फेणीसाठी प्रसिद्ध राज्य
७१. श्रीमंत माणूस
७२. सांगणे
७५. पाकळ्यांचा पांढरा कंद
७६. वर्ष, साल
७७. गजवदन, गणपति
८०. सत्व
८१. बासरी
८२. एक मिश्र धातू
८३. मृत्यू पावणे
८४. शेणाचा गोळा
८५. कथाकहाण्यांमधील ऐसपैस गाव

### उभे शब्द

१. राक्षस
२. भरदिवसा
३. ढग
४. गप्प बसण्याचा वसा
५. करगोटा
६. शर्त
७. गाजावाजा
८. रस्ता, मार्ग
९. लोकांची दाटी
१२. वाकळा नसलेला
१५. धकधक
१७. वितभर असले तरी तालावर नाचवणारे
१८. अद्याप
२१. न्यूनता, उणीव
२३. खाली पडू न देता, नेहमी
२७. सुताराकडचे दातेरी हत्यार
२८. जल
२९. महिना
३०. जहाज, नौका
३१. खोदकाम
३३. चालू काळ
३५. जुळे
३६. वेतन
४१. दुष्ट
४३. सोसाट्याचा वारा
४५. घटस्फोट
४६. मावा
४७. नदीला आलेले अतोनात भरते
४९. विशेष
५१. दुष्ट
५२. निकट
५३. भुईकोट किल्ला
५५. इजा
५६. कापड, वस्त्र
५७. पदर
६०. कमाई, उत्पन्न
६३. हेतू, कारण
६४. लबाडीचा बेत
६५. पापडात वापरला जाणारा क्षार
६७. कापणे
६८. पत्र
७०. पोते
७१. पैसेवाला
७३. दमणे
७४. रक्तवाहिनी
७६. समतल
७७. हत्ती
७८. खूप
७९. जुनाच्या विरुद्ध

### आडवे उत्तरे

१.दैनांदिनी ४.मौलिक ६.अर्धांगवायू १०.वरदान ११.वट १२.सर्दी १३.प्रासाद १४.व्रतबंध १६.भोग १७.पोर १९.अंत २०.धडक २२.वावटळ २४.जनावर २५.ओ २६.धमक २९.माज ३१.खडतर ३२.चेता-वणी ३४.गाय ३६.पहेलवान ३७.रवरव ३८.यम ३९.तात ४०.रखमाई ४२.तलवार ४४.नफा ४८.टन ५०.रखवालदार ५४.काळ ५५.जवळपास ५८.कल ५९.गढी ६०.आभाळ ६१.खंत ६२.मौत ६३.मत ६४.काय ६६.मनकवडा ६९.खंत ७०.गोवा ७१.धनिक ७२.कथन ७५.लसूण ७६.सन ७७.गजानन ८०.कस ८१.पावा ८२.जस्त ८३.वारणे ८४.पो ८५.आटपाटनगर

### उभे उत्तरे

१.दैत्य २.दिवसाढवळ्या ३.नीरद ४.मौनव्रत ५.कटिबंध ६.अट ७.गव-गवा ८.वाट ९.गर्दी १२.सरळ १५.धडधड १७.पोट १८.आजतागायत २१.कमतरता २३.वरचेवर २७.करवत २८.पाणी २९.माहे ३०.जलयान ३१.खनन ३३.वर्तमानकाळ ३५.यमल ३६.पगार ४१.खट ४३.वादळ ४५.फारकत ४६.खवा ४७.पूर ४९.खास ५१.खल ५२.लगत ५३.दाढी ५५.जखम ५६.वसन ५७.पालव ६०.आय ६३.मतलब ६४.कावा ६५.टाकणखार ६७.कर्तन ६८.डाक ७०.गोणपाट ७१.धनवान ७३.थकणे ७४.नस ७६.सपाट ७७.गज ७८.जास्त ७९.नवा



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### मुंबई-चेन्नई सामन्यात धोनी खेळण्याची शक्यता

**मुंबई**–वानखेडे स्टेडियमवर गुरुवारी मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात होणाऱ्या आयपीएल २०२६ च्या सामन्यात एम.एस. धोनी आणि विल जॅक्स मैदानात दिसू शकतात. मंगळवारी रात्री धोनी वानखेडेवर सराव करताना दिसला, तर विल जॅक्स मुंबईच्या संघात दाखल झाला आहे. चेन्नई सध्या गुणतालिकेत आठव्या स्थानावर असून त्यांना विजयाची नितांत गरज आहे.

हंगामापूर्वी एम.एस. धोनी पोटरीच्या स्नायूंच्या दुखापतीशी झुंज देत होता. मंगळवारी, त्याने वानखेडेवर अर्धा तास यष्टीरक्षण आणि ३० मिनिटे फलंदाजी केली. या दरम्यान, ४४ वर्षीय धोनी कोणत्याही त्रासाशिवाय मोठे फटके मार–ताना दिसला. जर तो उद्या खेळला, तर चेन्नईच्या फलंदाजीला बळ मिळेल. संघाने सहापैकी दोन सामने जिंकले आहेत.इंग्लंडचा क्रिकेटपटू विल जॅक्स भारतात दाखल झाला आहे. वैयक्तिक कारणांमुळे तो पहिल्या सहा सामन्यांमधून बाहेर होता. २०२६ च्या टी२० विश्वचषकात चार वेळा मसामनावीरफ ठरलेल्या जॅक्सने सोमवारी आणि मंगळवारी मुंबईच्या नेट्‌समध्ये सराव केला. त्याने सुमारे एक तास फलंदाजी केली आणि ऑफ–स्पिन गोलंदाजीही केली. त्याच्या आगमनामुळे मुंबईची म धली फळी आणि फिरकी गोलंदाजी मजबूत होईल.

### करो या मरो सामन्यात भारतीय संघ उतरणार

**जोहान्सबर्ग**–भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या म हिला क्रिकेट संघांमध्ये सध्या टी–२० आंतरराष्ट्रीय मालिका सुरु आहे. आतापर्यंत दोन सामने खेळले गेले असून, भारतीय संघ दोन्ही सामन्यांमध्ये पराभूत झाला आहे. मात्र, ही मालिका पाच साम न्यांची असल्यानं पुनरागमनाची अजूनही शक्यता आहे. मालिकेतील तिसरा आणि महत्त्वाचा सामना आज, बुधवार, २२ एप्रिल रोजी खेळला जाईल. टी–२० विश्वचषकाची तयारी : पाच सामन्यांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील तिसरा सामना आज जोहान्सबर्ग येथील वँडरर्स स्टेडियमवर खेळला जाईल. ही मालिका आयसीसी टी–२० विश्व–चषक २०२६ च्या आधी होत असल्यानं तिचं महत्त्व अधिकच वाढलं आहे. भारतीय संघाची कामगिरी अपेक्षेप्रमाणे प्रभावी नसली तरी, पुनरागमन शक्य आहे आणि कदाचित भारतीय संघ आजचा सामना जिंकेल. चिंतेची बाब म्हणजे, प्रथम फलंदाजी करताना भारतीय महिला संघ पहिल्या दोन साम न्यांमध्ये १५० धावांपर्यंतही पोहोचू शकला नाही. स्मृती आणि हरमनप्रीतकडून चांगल्या खेळीची अपेक्षा : कर्णधार हरमनप्रीत कौरला आता चांगली फलंदाजी करावी लागेल. स्मृती मंधाना आणि शेफाली वर्मा यांच्यावरही संघाला एक भक्कम आणि वेगवान सुरुवात करुन देण्याची जबाबदारी असेल.


### कॉन्ट्रोवर्सीवर भडकली विराटची एक्स गलफ्रेंड, सगळीच पोलखोल केली!

**नवी दिल्ली**:टीम इंडियाचा सुपरस्टार खेळाडू विराट कोहली सध्या कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत आहे. विराट कोहली सध्या आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी करतोय. पण विराट सोशल मीडियावरील लाईक कॉन्ट्रोवर्सीमुळे पुन्हा चर्चे त आलाय. काही दिवसांपूर्वी जर्मन रीलस्टार लिझलाझ हिचा फोटो लाईक केल्यामुळे कोहली ट्रोल झाला होता. अशातच आता कोहलीची चर्चा सोशल मीडियावर सुरू असताना विराट कोहलीची १२ वर्षापूर्वीची गर्लफ्रेंड इजाबेल लेइट हिने सोशल मीडियावर संताप व्यक्त केला आहे.महिलांच्या फोटोंचे कोलाज शेअर इजाबेल लेइट एक ब्राझिलियन मॉडेल आणि अभिनेत्री आहे, जिने प्रामुख्याने भारतीय चित्रपटसृष्टीत काम केले आहे. विराट कोहलीसोबतच्या जुन्या संबंधांमुळे ती अनेकदा चर्चेत असते. झाले असे की, एका इंस्टाग्राम पेजने विराट कोहलीच्या आयुष्याशी संबंधित असलेल्या महिलांच्या फोटोंचे कोलाज शेअर केले होते आणि अवनीत कौर यांचे

# राजस्थान रॉयल्सचा जायंट्‌सवर ४० धावांनी विजय

**नवी दिल्ली:** राजस्थान रॉयल्सने लखनौ सुपर जायंट्‌सचा ४० धावांनी पराभव केला आहे. प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने १५९ धावा केल्या होत्या, मात्र १६० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना लखनौच्या फलंदाजांनी निराशा केली. मिचेल मार्शच्या अर्धशतकाशिवाय इतर फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही, तर राजस्थानच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत विजय मिळवला. आयपीएल २०२६ स्पर्धेतील ३२ वा सामना लखनौ सुपर जायंट्‌स आणि राजस्थान रॉयल्स या दोन्ही संघामध्ये पार पडला. या सामन्यात लखनौने राजस्थानला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. पण राजस्थानच्या फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारता आली नव्हती. वैभव सूर्यवंशी या सामन्यात फ्लॉप ठरला. राजस्थानने लखनौसमोर विजयासाठी १६० धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना मिचेल मार्शने दमदार अर्धशतकं झळकावलं. पण त्याला इतर कुठल्याही फलंदाजाकडून साथ मिळाली नाही. तर दुसरीकडे राजस्थान रॉयल्सच्या गोलंदाजांनी अप्रतिम गोलंदाजी केली. हा सामना राजस्थान रॉयल्सने ४० धावांनी आपल्या नावावर केला.

लखनौ सुपर जायंट्‌स संघाला हा सामना जिंकण्यासाठी १६० धावांचा पाठलाग करायचा होता. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या लखनौला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. आयुष बदोनी शून्यावर धावबाद होऊन माघारी परतला. त्यानंतर कर्णधार ऋषभ पंत आणि एडन मारक्रम देखील शून्यावर माघारी परतला. लखनौला जशी सुरुवात हवी होती, तशी सुरुवात मिळू शकली नाही. एकट्या मिचेल मार्शने पूर्ण जोर लावला. त्याने अर्धशतकी खेळी केली. निकोलस पूरनने २२ धावांचे योगदान दिले. तर हिम्मत सिंगने १५ धावा केल्या. स्फोटक फलंदाज मुकुल चौधरी या सामन्यात अवघ्या ७ धावांवर माघारी परतला. या मोहम्मद शमी अवघ्या ६ धावांवर माघारी परतला. लखनौचा संघ या सामन्यात विजयापासून ४० धावा दूर राहिला.



लखनौच्या फलंदाजांचा फ्लॉप शो!

**राजस्थान रॉयल्सने केल्या १५९ धावा**

लखनौतील एकाना स्टेडिमवर पार पडलेल्या या सामन्यात लखनौ सुपर जायंट्‌स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या राजस्थान रॉयल्सने २० षटकांअखेर ६ गडी बाद १५९ धावा केल्या. राजस्थान रॉयल्स संघाला या सामन्यात हवी तशी सुरुवात करता आली नव्हती. कारण यशस्वी जैस्वाल अवघ्या २२ धावा करून माघारी परतला.

तर वैभव सूर्यवंशी देखील काही खास करू शकला नाही. तो अवघ्या ८ धावांवर माघारी परतला. वैभव बाद होताच ध्रुव जुरेल देखील शून्यावर माघ–ारी परतला. कर्णधार रियान परागने या सामन्यात २० धावांचे योगदान दिले. शिमरन हेटमायरने २२ धावांची खेळी केली. शेवटी रवींद्र जडेजा ४३ धावांवर नाबाद राहिला. तर डोनोवन फरेराने २० धावांची खेळी केली.

## फिक्सिंगनंतर ड्रग्ज स्कँडल, टी२० वर्ल्ड कपमध्ये भारताविरुद्ध ड्रग्ज घेऊन खेळला पाकिस्तानी क्रिकेटर!

मुंबई–पाकिस्तान क्रिकेट पुन्हा एकदा वादात सापडलं आहे. भारत आणि श्रीलंकेमध्ये फ ेब्रुवारी–मार्च महिन्यात झालेल्या टी–२० वर्ल्ड कपवेळी पाकिस्तानचा क्रिकेटपटू ड्रग टेस्टमध्ये पॉझिटिव्ह आला आहे, यानंतर आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने या प्रकरणाच्या चौकशीला सुरूवात केली आहे. टी–२० वर्ल्ड कप सुरू असतानाच खेळाडूचं सॅम्पल घेण्यात आले होते. आयसीसी नियमांनुसार नियमित तपासाचा भाग म्हणून हे सॅम्पल घेण्यात आले, ज्यात ड्रग टेस्ट पॉझिटिव्ह आली आहे.

पाकिस्तानचा ऑलराऊंडर मोहम्मद नवाझ याची ड्रग टेस्ट पॉझिटिव्ह आली आहे. पाकिस्तानने टी–२० वर्ल्ड कपमधले त्यांचे सगळे सामने श्रीलंकेमध्ये खेळले होते. ३२ वर्षाच्या नवाजची टी–२० वर्ल्ड कपमधली कामगिरी निराशाजनक होती. त्याने टी–२० वर्ल्ड कपच्या ५ इनिंगमध्ये फक्त १५ रन केल्या आणि ७ विकेट घेतल्या. पाकिस्तानची टीम टी–२० वर्ल्ड कपच्या सुपर–८ स्टेजम धूनच बाहेर झाली होती.



ड्रग टेस्ट पॉझिटिव्ह आल्यानंतर मोहम्मद नवाझचं करिअरही संकटात आलं आहे. इंग्लंड काऊंटी क्लब सरेनेही मोहम्मद नवाझसोबतचा करार रद्द केला आहे. नवाझला आधीच टी–२० ब्लास्टमध्ये खेळण्यासाठी एनओसी मिळाली होती, तसंच या आठवड्यात तो करारावर सहीदेखील करणार होता, पण आता २६ मे ते १८ जुलैपर्यंत होणाऱ्या या लीगमध्ये नवाझ खेळू शकणार नाही. सरेने याबद्दल कोणतीही प्रतिक्रिया द्यायला नकार दिला आहे. आता पीसीबी आणि आयसीसी नवाझवर काय कारवाई करणार, याकडे लक्ष लागलं आहे. पीएसएलमध्येही नवाझला संघर्ष करावा लागत आहे. मुलतान सुलतान्सकडून खेळणाऱ्या नवाझने या मोसमातल्या ८ सामन्यांच्या ४ इनिंगमध्ये फक्त ३६ रन केल्या आहेत, तर बॉलिंगमध्ये त्याने ६ विकेट घेतल्या आहेत, पण त्याची बॉलिंग सरासरी ३२.६६ आणि इकोनॉमी रेट १०.८८ ची आहे.मोहम्मद नवाझची आंतरराष्ट्रीय कारकिर्द मोहम्मद नवाझने ६ टेस्टमध्ये १४४ रन करून १६ विकेट घेतल्या आहेत, तर ४४ वनडेमध्ये त्याच्या नावावर ५३८ रन आणि ४९ विकेट आहेत. ९८ टी–२० सामन्यांमध्ये ९११ रन आणि १०१ विकेट घेतल्या आहेत.

टी–२० वर्ल्ड कप २०२२ मध्ये विराट कोहलीने पाकिस्तानविरुद्ध मेलबर्नच्या मैदानात ऐतिहासिक खेळी केली होती, तेव्हा शेवटची ओव्हर मोहम्मद नवाझने टाकली होती. या ओव्हरमध्ये भारताला शेवटच्या २ बॉलमध्ये विजयासाठी २ रनची गरज होती, तेव्हा नवाझने बॅटिंग करणाऱ्या अश्विनला वाईड बॉल टाकला होता. पाकिस्तानी चाहत्यांनी मोहम्मद नवाझला या पराभवासाठी जबाबदार धरलं. या सामन्यात नवाझने हार्दिक पांड्या आणि दिनेश कार्तिकची विकेट घेतली

## शुभमन गिल, बुमरा भारतीय संघातून बाहेर जाण्याची शक्यता

मुंबई : भारतीय क्रिकेट संघाला आयपीएल २०२६ नंतर लगेचच अफगाणिस्तानविरुद्ध एकमेव कसोटी सामना खेळायचा आहे. मात्र या सामन्यापूर्वी एक मोठी बातमी समोर आली आहे. या कसोटीसाठी भारताचे काही आघाडीचे आणि वरिष्ठ खेळाडू विश्रांतीवर ठेवले जाऊ शकतात. त्यामुळे या सामन्यात काही नव्या चेहर्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे, तर अनेक स्टार खेळाडू संघाबाहेर राहू शकतात.

आयपीएलमध्ये अद्याप प्लेऑफचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर झालेले नसले, तरी क्वालिफायर–१, एलिमिनेटर, क्वालिफायर–२ आणि फायनल असे सामने जूनच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रमुख खेळाडूंवर कामाचा ताण वाढणार आहे. याच पार्श्वभूमीवर, ‘टाइम्स ऑफ इंडिया’च्या वृत्तानुसार, अफगाणिस्तानविरुद्ध ६ ते १० जूनदरम्यान होणार्या कसोटी सामन्यासाठी भारताचे वरिष्ठ खे–ळाडू विश्रांती घेऊ शकतात. हा सामना न्यू चंदीगडमधील महाराजा यादवेंद्र सिंह स्टेडियम, मुल्लनपूर येथे खेळवला जाणार आहे. जर आयपीएल प्लेऑफ आणि कसोटी सामना एकाच काळात आले, तर अनेक स्टार खेळाडू कसोटीला मुकू शकतात.

उदाहरणार्थ, शुभमन गिल जर गुजरात टायटन्स प्लेऑफमध्ये पोहोचले, तर तो आयपीएलमध्ये नेतृत्व करताना दिसेल आणि कसोटीत अनुपस्थित राहू शकतो. अशा परिस्थितीत भारताच्या कसोटी संघाचे नेतृत्व दुसर्या खेळाडूकडे जाऊ शकते. तसेच, केएल राहुल आणि जसप्रीत बुमरा यांसारखे अनुभवी खेळाडूही, जर त्यांच्या संघांनी प्लेऑफमध्ये

## राजस्थान रॉयल्सची विजयासह गुणतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर

लखनौ : रिषभ पंतच्या लखनौ सुपर जायंट्‌सला सोपा सामनाही जिंकता आला नाही. इंडियन प्रीमिअर लीग २०२६ मधील राजस्थान रॉयल्सविरुद्धचा सामना गोलंदाजांनी सेट केला होता, परंतु लखनऊ सुपर जायंट्‌सच्या फलंदाजांनी माती खाल्ली. १६० धावांचे माफक लक्ष्यही त्यांना पार करता आले नाही. कर्णधार रिषभ पंत, निकोलस पूरन व एडन मार्करम यांचा अपयशाचा पाढा कायम राहिला. राजस्थान रॉयल्सने सलग दोन पराभवानंतर विजय मिळवत आयपीएल २०२६ गुणतालिकेमध्ये थेट दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली. लखनऊ सुपर जायंट्‌सचा हा सलग चौथा पराभव ठरला. राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परा–गने कमी धावसंख्या असतानाही गोलंदाज बदली करताना वापरलेल्या कल्पकतेमुळे लखनऊ सुपर जायंट्‌सचा डाव ११९ धावांमध्येच आटोपला गेला.राजस्थान रॉयल्सने ५ बाद ७७ धावांवरून ६ बाद १५९ धावांपर्यंत मजल मारून चांगले पुनरागमन केले. मोहम्मद शमीने तिसऱ्याच षटकात राजस्थान रॉयल्सच्या यशस्वी जैस्वाल ( २२) व ध्रुव जुरेल ( ०) यांना सलग चेंडूवर माघारी पाठवले. त्यानंतर मोहसिन खानच्या निर्धाव षटकात वैभव सूर्यवंशीची ( ८) विकेट पडली. कर्णधार रियान पराग ( २०) व शिमरोन हेटमायर ( २२) यांना अनुक्रमे प्रिंस यादव व मोहसिन खान यांनी माघारी पाठवले. राजस्थान रॉयल्सचा निम्मा संघ ७७ धावांवर तंबूत परतला होता. पण, रवींद्र जडेजा मैदानावर उभा राहिला आणि त्याने डोनोव्हन फरेरासह ( २०) सहाव्या विकेटसाठी ३३ धावा जोडल्या आणि शुभमन दुबेसह ( १९) सातव्या विकेटसाठी २५ चेंडूत ४९ धावा जोडल्या. शमीसह, मोहसिन व प्रिंस यांनी प्रत्येकी दोन

## यशस्वी जयस्वालने चौकार ठोकले, रिषभ पंत संतापला, मोहम्मद शमीने अनुभव पणाला लावला

लखनौ–आयपीएलमध्ये आज लखनौ सुपर जायंटस आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना सुरु आहे. लखनौ टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. आजचा सामना लखनौच्या होमग्राऊंडवर होत आहे. लखनौ गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे तर राजस्थान रॉयल्स चौथ्या स्थानावर आहे. राजस्थान रॉयल्सच्या डावाची सुरुवात यशस्वी जयस्वाल आणि वैभव सूर्यवंशी या दोघांनी केली. लखनौचा अनुभवी गोलंदाज मोहम्मद शमी यानं राजस्थानला लागोपाठ दोन धक्के दिले.

लखनौकडून पहिली ओव्हर मोहम्मद शमीनं टाकली, त्यामध्ये त्यानं ७ धावा दिल्या. तर दुसऱ्या ओव्हरमध्ये राजस्थानच्या वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जयस्वाल या दोघांनी मिळून १३ धावा दिल्या. ही ओव्हर प्रिन्स यादवनं टाकली. लखनौची धावसंख्या दोन ओव्हरनंतर बिनबाद २० धावा होती. मोहम्मद शमी लखनौकडून तिसरी ओव्हर टाकण्यासाठी आला. यशस्वी जयस्वालनं पहिल्या बॉलवर एकही रन घेतली नाही.



मात्र, पुढे यशस्वी जयस्वालनं सलग तीन चौकार मारले. या दरम्यान जयस्वालनं दुसरा चौकार मारला तेव्हा रिषभ पंत संतापलेला दिसून आला. यानंतर ओव्हरच्या पाचव्या आणि सहाव्या बॉलवर मोहम्मद शमीनं यशस्वी जयस्वाल आणि ध्रुव जुरेल यांना बाद केलं. मोहम्मद शमीनं सलग दोन बॉलवर दोन विकेट घेतल्यानं लखनौचे संघमालक संजीव गोयंका देखील आनंदी झाल्याचं पाहायला मिळालं.

यशस्वी जयस्वाल २२ धावा करुन बाद झाला तर ध्रुव जुरेल शुन्यावर बाद झाला. त्याला खातं उघडता आलं नाही. यानंतर पुढच्याच ओव्हरमध्ये मोहसीन खान यानं वैभव सूर्यवंशीला ८ धावांवर बाद केलं. विशेष म्हणजे त्या ओव्हरमध्ये वैभव सूर्यवंशीला एकही धाव घेता आली नाही.

मोहम्मद शमीनं राजस्थानच्या डावाच्या पाचव्या ओव्हरमध्ये ५ धावा दिल्या. यामुळं लखनौसमोर राजस्थान रॉयल्सनं पॉवर प्लेमध्ये ३ बाद ४४ धावा केल्या.

लखनौ सुपर जायंट्स (प्लेइंग इलेव्हन): मिशेल मार्श, आयुष बदोनी, रिषभ पंत (विकेट कीपरकर्णधार), निकोलस पूरन, एडेन मार्करम, मुकुल चौधरी, मोहम्मद शमी, मोहसिन खान, प्रिन्स यादव, दिग्वेश सिंह राठी, मयंक यादव

राजस्थान रॉयल्स (प्लेइंग इलेव्हन): यशस्वी जयस्वाल, वैभव सूर्यवंशी, ध्रुव जुरेल (विकेट कीपर), रियान पराग (कर्णधार), शिमरोन हेटमायर, डोनोवन फरेरा, रवींद्र जडेजा, जोफ्रा आर्चर, रवि बिश्नोई, बृजेश शर्मा, नांद्रे बर्गर

# रोहित, धोनीबाबत संभ्रमच; मुंबईचे सलग दुसऱ्या विजयाचे लक्ष्य; आज चेन्नईशी गाठ

दुखापतीमुळे बाहेर असलेल्या रोहित शर्मा आणि म हेंद्रसिंह धोनीच्या पुनरागमनाकडे सर्वांचे लक्ष लागले असून, मुंबई सलग दुसऱ्या विजयासाठी तर चेन्नई पराभवाचे सत्र संपवण्यासाठी मैदानात उतरेल. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सराव करताना महेंद्रसिंह धोनी; आजच्या सामन्यात रोहित शर्मासह धोनी खेळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. (संग्रहित छायाचित्र)

मुंबई : लय मिळवण्यासाठी झगडणारे मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज हे दोन लोकप्रिय संघ इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी–२० क्रिकेटमध्ये आज, गुरुवारी आमनेसामने येणार आहेत. मुंबईच्या ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर होणाऱ्या या सामन्यात रोहित शर्मा आणि महेंद्रसिंह धोनी या माजी कर्णधारांच्या पुनरागमनाकडे चाहत्यांचे विशेष लक्ष असेल.

रोहित आणि धोनी या दोघांनाही पायाच्या दुखा–पतीचा सामना करावा लागला. ४४ वर्षीय धोनी यंदाच्या हंगामात अद्याप एकही सामना खेळलेला नाही. मात्र, गेले दोन दिवस त्याने वानखेडे स्टेडियम वर कसून सराव केला. त्यामुळे तो मुंबईविरुद्धच्या सामन्यासाठी उपलब्ध असणे अपेक्षित आहे.

दुसरीकडे, ३८ वर्षीय रोहित हंगामातील पहिले चार सामने खेळला होता. त्यात तो चांगल्या लयीतही होता. परंतु पायाच्या दुखापतीमुळे त्याला गेल्या दोन सामन्यांना मुकावे लागले. आता तो मुंबई संघात परतण्याची शक्यता आहे.

मुंबई आणि चेन्नई हे ‘आयपीएल’च्या इतिहासातील सर्वांत यशस्वी संघ असून त्यांनी प्रत्येकी पाच वेळा जेतेपद पटकावले आहे. विशेष म्हणजे, मुंबईने रोहितच्या, तर चेन्नईने धोनीच्या नेतृत्वाखालीच आ–पली सर्व जेतेपदे मिळवली आहेत. मुंबईने यंदाच्या हंगामाची सुरुवात विजयासह केली होती. मात्र, त्यानंतर सलग चार सामन्यांत त्यांना हार पत्करावी लागली. गेल्या सामन्यात गुजरात टायटन्सविरुद्ध मुंबईला सूर गवसल्याचे संकेत मिळाले. या सामन्यात



**वेळ : सायं. ७.३० वा.थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, ३, १ हिंदी,**

मुंबईने ९९ धावांनी बाजी मारत पराभवांची मालिका खंडित केलीच, शिवाय आपली निव्वळ धावगतीही (०.०६७) सुधारली. त्यामुळे आता चेन्नईविरुद्ध घरच्या मैदानावर विजय मिळवल्यास मुंबईचा संघ गुणतालिकेत आणखी वरच्या स्थानी झेप घेऊ शकेल.

मुंबईप्रमाणेच चेन्नईनेही सहापैकी केवळ दोन सामने जिंकले असून चारमध्ये हार पत्करली आहे. गेल्या सामन्यात चेन्नईचा संघ सनरायजर्स हैदराबादकडून पराभूत झाला. या सामन्यातच प्रतिभावान फलंदाज आयुष म्हात्रेला पायाची दुखापत झाली आणि तो स्पर्धेबाहेर गेला. त्यामुळे चेन्नईची चिंता वाढली आहे. आता अन्य फलंदाजांनी कामगिरी न उंचावल्यास चेन्नईचे स्पर्धेतील आव्हान धोक्यात येऊ शकेल. जिओहॉटस्टार ॲप सूर्यकुमारबाबत चिंता कायम मुंबई इंडियन्सचे तारांकित खेळाडू सुरुवातीच्या सामन्यांत अपयशी ठरत होते. मात्र, गेल्या सामन्यात गुजरातविरुद्ध तिलक वर्माने शानदार शतक साकारले, तर जसप्रीत बुमराने हंगामातील पहिला बळी मिळवला. कर्णधार हार्दिक पंड्याही वेळोवेळी योगदान देत आहे. क्विंटन डिकॉकने वानखेडेवरील गेल्या सामन्यात शतक साकारले. नमन धीरनेही प्रभावित केले. त्यातच इंग्लंडचा अष्टपैलू विल जॅक्सचे आगमन झाल्याने मुंबई संघाला बळकटी मिळणार आहे.

परंतु मुंबईसाठी अनुभवी फलंदाज सूर्यकुमार यादवची कामगिरी चिंतेचा विषय ठरत आहे. सूर्यकुमारला सहा सामन्यांत २०.१६च्या सरासरीने केवळ १२१ धावा करता आल्या आहेत. त्यामुळे त्याने कामगिरी उंचावणे आवश्यक आहे.

**चेन्नईची मुंबईकरांवर भिस्त**–आयुष म्हात्रे उर्वरित हंगामाला मुकणार आहे. मात्र, चेन्नई संघात सर्फराज खान आणि शिवम दुबे हे अन्य दोन मुंबईकर खेळाडू आहेत. आयुषच्या अनुपस्थितीत सर्फराजला अधिक वरच्या क्रमांकावर खेळण्याची संधी मिळू शकते. अखेरच्या षटकांत फटकेबाजीची जबाबदारी दुबेवर असेल. त्यामुळे या दोघांचे योगदान चेन्नईसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. कर्णधार ऋतुराज गायकवाड सध्या संघर्ष करत आहे. संजू सॅमसनच्या कामगिरीत सातत्य नाही. त्यांनी अधिक जबाबदारी घेऊन खेळणे आवश्यक आहे. गोलंदाजीत अंशुल कंबोजची भूमिका सर्वांत महत्त्वाची ठरेल.

# महाधनकडून बीडमध्ये पशुधन विकास प्रकल्पाची सुरुवात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी पुढाकार

**लातूर/प्रतिनिधी :** दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (DFPCL) ची १००% उपकंपनी असलेल्या महाधन अॅग्रीटेक लिमिटेडने आपल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) उपक्रमांतर्गत मराठवाडा विभागातील बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात महाधन पशुधन विकास प्रकल्प सुरू केला आहे. हा प्रकल्प बीएआयएफ लाईव्हलीहूड अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची संकल्पना आणि अंमलबजावणी श्री एस. सी. मेहता, चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, DFPCL आणि श्रीमती पारुल मेहता, मॅनेजिंग ट्रस्टी, खीत्रेप्र यांच्या दूरदृष्टी आणि मार्गदर्शनाखाली साकारली आहे.

या प्रकल्पाचे उद्घाटन श्री. प्रमोद जगताप, सहयोगी संचालक, ईशान्य फाउंडेशन (DFPCL ची CSR शाखा) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. प्रदीप खोसे, मुख्य कार्यक्रम अधिकारी, बीएआयएफ, डॉ. रवीराज जाधव, उपाध्यक्ष, आणि डॉ. संतोष एकशिंगे, यांच्यासह गावांचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत परिसरात एकूण १० पशुधन विकास केंद्रे स्थापन करण्याचा कंपनीचा मानस आहे. पहिल्या टप्प्यात पिंपळगाव दाणी, डोंगरगण आणि हरिनारायण आष्टा येथे केंद्रांचे उद्घाटन करण्यात आले असून, उर्वरित केंद्रे टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश पशुधनाचा सर्वांगीण विकास करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा आहे. यामध्ये कृत्रिम रेतन सेवा, चारापिकांची लागवड, लसीकरण, तसेच पशुपालक शेतकऱ्यांसाठी क्षमता वृद्धी (प्रशिक्षण) कार्यक्रम यांसारख्या महत्त्वाच्या उपक्रमांचा समावेश आहे. त्यामुळे उत्पादकता व शाश्र्वतता वाढण्यास मदत होणार आहे.

श्री. नरेश कुमार पिनिसेट्टी, अध्यक्ष – कॉर्पोरेट गव्हर्नन्स, दीपक फर्टिलायझर्स यांचे म्हणणे: हा उपक्रम शाश्वत आणि विस्तारक्षम उपायांद्वारे ग्रामीण उपजीविकेला बळकटी देण्याच्या महाधनच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे. पशुधन विकासावर लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन मूल्य निर्माण करणे आणि प्रादेशिक कृषी परिसंस्थेत मोलाचे योगदान देणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

या प्रकल्पामुळे परिसरातील पशुपालक शेतकऱ्यांना दर्जेदार सेवा, ज्ञान आणि संसाधनांपर्यंत अधिक चांगला प्रवेश मिळून लक्षणीय लाभ होण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पामुळे प्रदेशातील शेतकऱ्यांच्या पशुधनाला दर्जेदार सेवा, ज्ञान आणि साधनसामग्री यांचा प्रवेश मिळून लक्षणीय लाभ होण्याची अपेक्षा आहे.



महाधन ॲग्रीटेक लिमिटेड ही दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (DFPCL) ची संपूर्ण मालकीची उपकंपनी असून, संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांसाठी नाविन्यपूर्ण कृषी उपाय उपलब्ध करून देण्यावर कंपनीचा भर आहे. खत क्षेत्रामध्ये मजबूत उपस्थितीसह, महाधन शेती उत्पादनक्षमता वाढविणे आणि मातीचे आरोग्य सुधारण्याच्या उद्देशाने विविध प्रकारची पिक पोषण उत्पादने आणि सल्लागार सेवा प्रदान करते. शेतकरी-केंद्रित दृष्टिकोन आणि शाश्र्वत शेतीप्रती असलेली बांधिलकी यांमुळे कंपनी कृषी परिसंस्थेला बळकटी देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे

## विद्यार्थी सहाय्यक मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ.नागोराव कुंभार तर कार्याध्यक्ष प्रा.फ.म.शहाजिंदे यांची निवड





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदी विचारशलाकांचे संपादक,ज्येष्ठ विचारवंत डॉ.नागोराव कुंभार यांची तर कार्याध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रा.फ.म.शहाजिंदे यांची बिनविरोध एकमताने निवड करण्यात आली.

विद्यार्थी सहाय्यक मंडळाची रविवार,दि.१९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी,शिवनगर येथील डॉ.नागोराव कुंभार यांच्या आई निवासस्थानी,वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.यावेळी विद्यार्थी सहाय्यक मंडळाची सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांसाठी कार्यकारिणी निवडण्यात आली. यात अध्यक्ष -डॉ. नागोराव कुंभार,कार्याध्यक्ष-प्रा.फ.म.शहाजिंदे, सचिव-डॉ. नागनाथ मोटे,कोषाध्यक्ष- प्रा.बी.एस.पळसकर,उपाध्यक्ष-डॉ.कुसूमताई मोरे,सहसचिव-विक्रम कदम,तर सदस्यपदी डॉ.मन्मथअप्पा भातांब्रे,ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे,प्रा.डॉ. सुनीता गिरवलकर, प्रा.सुधीर साळुंके,प्रा.ओमप्रकाश होळीकर, प्रा.सूचेता जनार्दनराव वाघमारे, ॲड.इरफान रहीमसाहेब शेख यांची एकमताने निवड करण्यात आली.

प्रारंभी विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे सचिव डॉ.नागनाथ मोटे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचन,तसेच नवीन कार्यकारिणी निवडीसह अन्य विषय सभेपुढे मांडले.त्यावर साधक बाधक चर्चा होवून वरील प्रमाने पाच वर्षांसाठी कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली.तत्पूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार,माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर,माजी खा.डॉ.जनार्दन वाघमारे,माजी आ.गंगाधर पटणे,डॉ.बाबा आढाव.साथी पन्नालाल सुराणा,माजी नगराध्यक्ष मन्मथअप्पा लोखंडे, माजी महापौर सुरेश पवार,डॉ.जयसिंगराव पवार आदी मान्यवरांना आदरांजली वाहण्यात आली.

## भारतीय संविधानाचे वाचन, चिंतन आणि कृतिशील आचरण महत्त्वाचे- प्रो. डॉ.गवई

लातूर/प्रतिनिधी : भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला ''भारतीय संविधान'' हा मौलिक आणि पवित्र ग्रंथ दिला. त्यामुळे आज प्रत्येक घराघरांमध्ये भारतीय संविधानाचे वाचन, चिंतन आणि कृतिशील आचरण महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्रोफेसर डॉ.संजय गवई यांनी केले. दारिद्र्य विरोधी अभियान, महाराष्ट्र, ग्रामपंचायत कार्यालय आणि शिवाजी माध्यमिक विद्यालय, कवठाळ यांच्या संयुक्त विद्यमाने कवठाळ येथील ग्रामपंचायत सभागृहामध्ये भारतीय संविधान ७५ वर्ष पूर्ती व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती निमित्त ''घरघर संविधान'' मोहिमेच्या पहिला टप्प्याचे उद्घाटन प्रोफेसर डॉ.संजय गवई यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपसरपंच मल्लिकार्जुन हुडे हे होते तर विचारमंचावर प्रमुख अतिथी पोलीस उपनिरीक्षक भीमराव गायकवाड, माजी नगरसेवक प्रकाश गायकवाड, संयोजक अभंगराव सूर्यवंशी, मुख्याध्यापक हरिषचंद्र चामले, संजय धनुरे, राजकुमार धनुरे, प्रा.विठ्ठलराव सुरे, बीट जमादार राजेश लामतुरे आणि ममता गवई यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत ज्योती महात्मा बसवेश्वर आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ.संजय गवई म्हणाले की, भारतीय संविधान हे प्रत्येक घरामधील प्रत्येक व्यक्तीने वाचणे अत्यंत आवश्यक आहे. अभंगराव सूर्यवंशी यांनी या अभियानाच्या माध्यमातून भारतीय संविधान हे घरातील प्रत्येक व्यक्तीच्या हातामध्ये देण्याचे राष्ट्रीय कार्य सुरू केले आहे असे सांगून त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.यावेळी पोलीस उपनिरीक्षक भीमराव गायकवाड बोलताना म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानाच्या निर्मितीमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यामुळेच त्यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून संबोधले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण देशासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांनी शिका हा महत्वाचा संदेश समाजाला दिल.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अभंगराव सूर्यवंशी करताना म्हणाले की, भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत घर घर संविधान या मोहिमेचा पहिला टप्प्याचे उद्घाटन आज कवठाळ येथे संपन्न होत आहे. या अभियानाची व्याप्ती संपूर्ण जिल्ह्यामध्ये केली जाईल आणि त्यानंतर मराठवाडा व संपूर्ण महाराष्ट्रामध्ये घरघर संविधान या मोहिमेअंतर्गत राष्ट्रीय कार्य केले जाईल यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करण्याचे विनंती त्यांनी यावेळी केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय धनुरे यांनी केले तर आभार वरूनराज सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुमित भडके, संदीपान हणमंते, सार्थक गवई, पृथ्वीराज सूर्यवंशी, दयानंद कारभारी, वामन हणमंते, संगम पताळे, सायबू सय्यद, लायक शेख, खादर शेख, सरू ताई स्वामी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

## १० मे रोजी बौद्ध साहित्य संमेलनानिमित्त रोहित पिसाळ लातूरमध्ये

**लातूर/प्रतिनिधी :** १० मे रोजी बौद्ध साहित्य संमेलना निमित्त उद्योजक तथा बौद्ध अभ्यासक माननीय रोहित पिसाळ हे लातूर येथे येत असून त्यांचे लातूर मधील आगमन म्हणजे एक वेगळे आकर्षण ठरणार असून, त्यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी लातूरमध्ये चालू असल्याचे, बौद्ध साहित्य संमेलन संयोजन समितीचे अध्यक्ष माननीय चंद्रकांत शिंदे, कार्याध्यक्ष तथा संयोजक राजेंद्र कांबळे, सचिव यु.डी. गायकवाड यांनी कळविले आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, दिनांक दहा मे २०२६ वार रविवार रोजी लातूर येथील भालचंद्र ब्लड बँक येथे दुसऱ्या मराठी बौद्ध साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रसिद्ध उद्योगपती तथा बौद्ध अभ्यासक माननीय रोहित पिसाळ, तसेच संमेलन अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध साहित्यिक,मा. डॉ .प्रशांत गायकवाड, डॉ. नारायण कांबळे, डॉ. विजय गैबीमोरे, प्रा. सुकुमार कांबळे, डॉ. गिरीश मोरे, अमित मेधावी, जगदीश ओहोळ यांच्यासह अनेक साहित्यिक या संमेलनास उपस्थित राहणार असून या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अध्यक्ष मा.चंद्रकांत शिंदे, कार्याध्यक्ष तथा संयोजक अर्थसत्ता न्यूज चे संपादक राजेंद्र कांबळे(मो.९९२१६६०९२५) उपाध्यक्ष भगवान लोखंडे, डी.एस. नर्सिंगे, सचिव यु.डी. गायकवाड ,सहसचिव भगवान बनसोडे, जी.जी .कांबळे कोषाध्यक्ष एम. एम. बलांडे, सहकोषाक्ष पल्लवी घोबाळे, मंगलताई कांबळे, मुख्य निमंत्रक एड. धम्मदीप बलांडे क्षंतरक्षित सुरवसे रवींद्र राजेगावकर डॉ. लहू वाघमारे, डॉ. शिवाजीराव गाडे, देवदत्त बनसोडे, मारुती सर्वदे,डॉ. प्रशांत मुगळे, डॉ. निखिल कांबळे अशोक बनसोडे, राजेंद्र बनसोडे, अलका गायकवाड ,नितीन गायकवाड, इत्यादीने केले आहेत.

# वाढत्या उष्णतेमुळे वीजयंत्रणेजवळ कचरा टाकू अथवा जाळू नये महावितरणचे आवाहन



रोहित्राजवळील कचरा जळाल्याने वीजयंत्रणेला मोठा फटका बसतो. पर्यायाने वीजग्राहकांनाही याची झळ सहन करावी लागते. रोहीत्रे उन्हाच्या तिव्रतेने गरम झालेले असतात. अशावेळी रोहीत्राजवळ कचरा जाळल्यास त्याची धग रोहीत्रास बसून रोहीत्राचे तापमान वाढल्याने प्रसंगी रोहीत्रास आग लागून रोहीत्र जळून जाते. परिणामी वीजपुरवठा खंडीत होतो. त्याचबरोबर रोहीत्राचा स्फोट झाल्यास गंभीर अपघातही होण्याची शक्यता असते.त्यामुळे वीजग्राहकांनी सजग राहून रोहीत्राजवळ कचरा टाकू नये अथवा कचरा टाकून जाळणाऱ्यास मज्जाव करावा.

**– अरविंद बुलबुले, मुख्य अभियंता, महावितरण लातूर परिमंडळ**

**लातूर/प्रतिनिधी :** वाढत्या उष्णतेमुळे आग लाण्याचे प्रकार वाढत असल्याने महावितरणच्या वीजयंत्रणेजवळ कचरा टाकण्याचे व तो जाळण्याचे प्रकार नेहमीच होत असतात. महावितरण महानगर पालिका प्रशासनाने वारंवार सूचना देवूनही रोहीत्रा जवळ कचरा सातत्याने टाकलला जातो. मागील वर्षी रोहित्रा जवळ कचरा जाळल्याने रोहित्र जळून वीजपुरवठा खंडीत होण्याबरोबरच लाखो रूपयांचे नुकसान झाल्याच्या घटना घडल्या आहेत. वाढत् जाणारी उष्णता लक्षात घेता वीजयंत्रणा सुरक्षीत राहण्यासाठी व अखंडीत वीजपुरवठयासाठी वीजयंत्रणेजवळ कचरा टाकू अथवा जाळू नये असे आवाहन महावितरणने केले आहे. शहरातील अनेक भागात नागरिक रस्त्यावर कचरा टाकत आहेत. मोकळ्या जागी, मुख्य रस्त्याच्या कडेला तसेच वीजपुरवठा करणाऱ्या रोहित्रांच्या जवळील कचरा जाळण्याचे प्रमाण कमी होत नाही. त्यामुळे रोहित्राला आग लागण्याच्या घटना घडत असतात. रोहित्राजवळील कचरा जाळल्यामुळे आग लागल्याने वीजपुरवठा खंडीत होण्याबरोबर लाखो रूपयांचे नुकसान दरवर्षी महावितरणला सोसावे लागते.प्रसंगी रोहित्रातील ऑईल लीकेज झाल्यास कचरा पेटण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

**नागरिकांनो, रोहित्रास आग लागल्यास येथे करा संपर्क**

नागरिकांनी उघड्यावर असलेल्या वीज यंत्रणेला धोका निर्माण होईल अशा ठिकाणी कचरा टाकू नये किंवा साठवलेला कचरा जाळू नये. अशा घटनांतून वीज यंत्रणेला आग लागल्यास अग्निशमन दला सोबतच महावितरणच्या १९१२ किंवा १९१२०, १८००-२१२-३४३५ आणि १८००-२३३-३४३५ या टोल फ्री क्रमांकांवर किंवा नजीकच्या महावितरण कार्यालयाला त्याची सूचना देण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## सोशल मिडीया प्लॅटफॉर्मसना एआय व्हिडीओवर लेबल अनिवार्य

**मुंबई/प्रतिनिधी :** आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा (एआय) वापर करून बनवलेले व्हिडीओ किंवा इतर साहित्य सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होते. अशा एआय साहित्यावर लेबल लावणे सोशल मिडीया साईटसना अनिवार्य केले जाणार आहे. यासाठी आयटी-नियम २०२१ मध्ये सुधारणा सूचवल्या असून निवीन मसूदा बनवण्यात आला आहे.

केंद्र सरकारने आयटी नियम २०२१ मध्ये काही महत्त्वपूर्ण सुधारणा सुचवत नवा मसुदा जाहीर केला असून, यावर सर्वसामान्य नागरिकांकडून अभिप्राय मागवला आहे. गेल्या ३० मार्च रोजी जाहीर केलेल्या मूळ मसुद्यात २१ एप्रिल रोजी अतिरिक्त बदलही करण्यात आले आहेत. नव्या प्रस्तावानुसार, एआयच्या मदतीने तयार केलेले व्हिडिओ, डीपफेक, तसेच व्हॉइस क्लोनिंगसारख्या कंटेंटवर स्पष्टपणे लेबल लावणे अनिवार्य करण्यात येणार आहे. म्हणजेच, जे कोणतेही कंटेंट खरे असल्यासारखे दिसते पण प्रत्यक्षात एआयद्वारे तयार किंवा बदललेले आहे, त्याबाबत स्पष्ट माहिती देणे आवश्यक असेल.या नियमांतर्गत डीपफेक व्हिडिओ, बनावट फोटो आणि एआयद्वारे तयार केलेले आवाज (व्हॉइस क्लोनिंग) यांचा समावेश होणार आहे. यामुळे वापरकर्त्यांना खऱ्या आणि कृत्रिम कंटेंटमधील फरक ओळखणे सोपे होईल, असा सरकारचा उद्देश आहे.सरकारने सर्व सोशल मीडिया मध्यस्थ (इंटरमीडियरी) प्लॅटफॉर्मसाठी या नियमांचे पालन बंधनकारक करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. यामध्ये बातम्या आणि चालू घडामोडींशी संबंधित कंटेंटचाही समावेश होऊ शकतो. मात्र, सामान्य वापरकर्त्यांना 'न्यूज पब्लिशर' म्हणून गणले जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.तसेच, माहिती व प्रसारण मंत्रालयाला कंटेंटविषयी कारवाई करण्याच्या प्रक्रियेत भूमिका देण्यात आली आहे.

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे जेईई मेन्स परीक्षेत उज्वल यश

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी ठाकूर दत्ता दिगंबरसिंग (९६.९३ पर्सेंटाइल), नवटाके स्वरांजली संतोष (९५.१० परसेंटाइल), दीक्षित वरद वसंत (८९.५१ परसेंटाइल), शिंदे वेदांत वसंत (८८.४६ परसेंटाइल), जाजे वैभवी शिवकुमार (८१.४८ परसेंटाइल), आगलावे वैभव दत्तात्रय (७९.४९ परसेंटाइल), कुरील रोहित जवाहर (७६.९३ परसेंटाइल) आणि माळी आदित्य गोपाळ (७०.६८ परसेंटाइल) या विद्यार्थ्यांनी जेईई मेन्स परीक्षेत घवघवीत यश संपादन करून कनिष्ठ



महाविद्यालयाच्या यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.

या सर्व गुणवान आणि गुणवंत विद्यार्थी आणि पालकांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. सिद्राम डोंगरगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मुख्य समन्वयक प्रो. डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी, पर्यवेक्षक डॉ.गुणवंत बिरादार, सीईटी समन्वयक प्रा.सतीश माळी आणि प्रा.श्रीकांत माळी, बोर्ड समन्वयक प्रा.केशव सूर्यवंशी, प्रा.माधुरी सरपे, प्रा.पूजा घार, प्रा.पुनम शेळके, प्रा.शैलजा पाटील, प्रा.नीता दलगडे, प्रा.रोहिणी शेटकार, प्रा.मेघश्याम बोळेगावे, प्रा.यज्ञेश जनगावे आणि प्रा.खानापुरे हेमंत यांची उपस्थिती होती.

कनिष्ठ महाविद्यालयात घेण्यात आलेल्या नियमित तासिका, नियमित सराव परीक्षा आणि विज्ञान शाखेचे सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनामुळे हे उज्वल यश प्राप्त झाले आहे. अशा भावना विद्यार्थी व पालकांनी सत्कार प्रसंगी व्यक्त केल्या.

तसेच नीट व जेईई सराव परीक्षा घेण्यासाठी प्रा.बेडगे गणेश आणि प्रा.खानापुरे हेमंत यांचे मौलिक सहकार्य लाभले.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उज्वल यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे आणि इतर सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्राचार्य, मुख्य समन्वयक, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, सीईटी समन्वयक, समन्वयक, सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी आदिनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## शस्त्रसंधीच्या घोषणेनंतरही कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १०० डॉलरच्या जवळ

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतची शस्त्रसंधी वाढवण्याचे निर्देश दिले असूनही, आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती आज वाढतच राहिल्या. आजच्या व्यवहारात ब्रेंट क्रूड तेल प्रति बॅरल १०० डॉलरच्या अगदी जवळ पोहोचले. त्याचप्रमाणे, वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूड तेलानेही प्रति बॅरल ९० डॉलरचा टप्पा ओलांडला. तथापि, नंतर त्यात किंचित घसरण नोंदवली गेली.

ब्रेंट क्रूड तेलाचा आजचा व्यवहार प्रति बॅरल ९९.२४ डॉलरवर, म्हणजेच १०० डॉलरच्या जवळ सुरू झाला. थोड्याच वेळात, त्यात वाढ होऊन ते प्रति बॅरल ९९.२९ डॉलरवर पोहोचले. भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ९:१५ वाजता, ब्रेंट क्रूड तेलाचा व्यवहार प्रति बॅरल ९८.३४ डॉलरवर सुरू होता. त्याचप्रमाणे, डब्ल्यूटीआय क्रूड तेलानेही आज ९० डॉलरचा टप्पा ओलांडला आणि ते प्रति बॅरल ९०.३८ डॉलरवर उघडले. त्यानंतर थोड्याच वेळात, त्यात वाढ होऊन ते प्रति बॅरल ९०.७१ डॉलरवर पोहोचले. तथापि, नंतर त्यात किंचित घसरण नोंदवली गेली. भारतीय वेळेनुसार सकाळी ९:१५ वाजता, डब्ल्यूटीआय कच्च्या तेलाचा भाव प्रति बॅरल ८९.४७ डॉलर होता.

तज्ज्ञांच्या मते, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धविरामाची घोषणा केली असली तरी, होर्मुझच्या सामुद्रधुनीतील नाकेबंदी कायम राहील असेही त्यांनी म्हटले आहे. याचा अर्थ, युद्धविराम असूनही मालवाहू जहाजे आणि तेल टँकर या महत्त्वाच्या सागरी मार्गातून प्रवास करू शकणार नाहीत. परिणामी, जागतिक कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय सुरूच राहील.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# तेर यात्रेत पशुप्रदर्शनाला प्रतिसाद; गोंडस संकरीत वासरांनी वेधले लक्ष



धाराशिव (प्रतिनिधी)- तेर येथील श्री संत गोरोबा काका यांच्या वार्षिक यात्रेनिमित्त जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती धाराशिव व तेर ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने तेर येथे आयोजित पशुप्रदर्शन व संकरीत वासरांना पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध गटांतील उत्तम पशुधनाचे प्रदर्शन भरल्याने परिसरातील शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

या प्रदर्शनात संकरीत वासरे गटात गुंडा थोडसरे (तेर) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. देशी बैल गटातही गुंडा थोडसरे (तेर) यांनी बाजी मारली. संकरीत गाय गटात विजय बारकुल (येरमाळा) प्रथम आले, तर देशी गाय गटात अजय शिंदे (किणी) यांनी प्रथम क्रमांक मिळवला. देशी कालवड गटात शिवाजी पडूळकर (तेर) यांनी अव्वल स्थान मिळवले. म्हैस रेडी गटात बालाजी मस्के (तेर), गु-हा म्हैस गटात संकेत झिंजे (तेर) आणि म्हैस गटात मच्छिंद्र कोकरे (तेर) हे विजेते ठरले. पशू प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन सभापती भाऊसाहेब खरसडे, पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा कदम, पंचायत समिती सदस्या जया नाईकवाडी, सरपंच दिदी काळे व उपसरपंच श्रीमंत फंड यांच्या हस्ते झाले. यावेळी नवनाथ नाईकवाडी व युवराज शिंदे यांनी पशुपालन व्यवसायाच्या वाढीसाठी अशा प्रदर्शनांचे महत्त्व अधोरेखित केले. तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संजय पांडे यांनी संकरीत पशुधनामुळे दूध उत्पादन वाढीस चालना मिळत असल्याचे सांगितले. स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. आभार प्रदर्शन पी. जे. नाथबुवे यांनी केले. यात्रेनिमित्त भरवण्यात आलेल्या या प्रदर्शनांमुळे पशुपालकांना उत्तम जातींची माहिती मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.पशुप्रदर्शनातील विजेत्यांना पारितोषिक देवून सन्मानीत करण्यात आले.

पशुपालकांसाठी मार्गदर्शक ठरले प्रदर्शन तेर येथे भरलेल्या पशुप्रदर्शनात विविध संकरीत व देशी जातींचे उत्कृष्ट पशुधन पाहण्याची संधी पशुपालकांना मिळाली. तज्ज्ञांनी पशुपालनातील आधुनिक पद्धती, चारा व्यवस्थापन, लसीकरण आणि उत्पादनवाढीबाबत मार्गदर्शन केले. उत्तम पशुधन निवडीबाबत प्रत्यक्ष माहिती मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. दूध उत्पादन वाढवण्यासाठी संकरीत जातींचा वापर वाढवण्यावर भर देण्यात आला.

# जनता दरबारातून ग्रामस्थांच्या समस्या समजून घेऊन तातडीने सोडवण्याचा प्रयत्न



कळंब (प्रतिनिधी)- पंचायत समिती कळंबच्या वतीने 'पंचायत समिती आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत विविध ठिकाणी जनता दरबारांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अनेक प्रलंबित प्रश्नांना थेट प्रशासनाच्या माध्यमातून मार्ग मिळत आहे.

मागील काही वर्षे पंचायत समितीवर प्रशासक राज असल्याने अनेकांची कामे प्रलंबित राहिली होती. त्यामुळे नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पंचायत समितीच्या वतीने १३ एप्रिल २०२६ पासून गणनिहाय जनता दरबारांना सुरुवात करण्यात आली आहे. या दरबारांमध्ये नागरिकांना आपल्या समस्या थेट अधिकाऱ्यांसमोर मांडण्याची संधी मिळत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांबाबत तसेच वैयक्तिक अडचणींबाबत नागरिक खुलेपणाने आपले प्रश्न मांडत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये अधिकाऱ्यांकडून तत्काळ दखल घेतली जात असून काही प्रश्नांवर जागीच तोडगा काढण्यात येत आहे. हा उपक्रम ग्रामीण भागातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरत असून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक मजबूत होत आहे.

या उपक्रमात जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती विश्वास कोकणे, महिला व बालकल्याण सभापती पूजा तुषार शिंदे, पंचायत समिती सभापती राजश्री वरपे, उपसभापती प्रणिता चव्हाण तसेच विविध अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या ऐकत आहेत. यामुळे अनेक प्रकरणांचा तातडीने निपटारा होत आहे.

अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक : खामसवाडी पंचायत समिती गणातील खामसवाडीसह माळकरंजा व गोविंदपूर येथील आढावा घेण्यात आला. यावेळी समाजकल्याण सभापती विश्वास कोकणे, पंचायत समिती सभापती राजश्री वरपे, उपसभापती प्रणिता चव्हाण, पंचायत समिती सदस्य सुवर्णा पाटील, खामसवाडी सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील तसेच पंचायत समितीचे अधिकारी-कर्मचारी आणि विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# नवोदय'मधील थलेटिक्स स्पर्धेत २०० खेळाडूंची कसरत

तुळजापूर (प्रतिनिधी)-जवाहर नवोदय विद्यालयात दोन दिवसीय संकुलस्तरीय थलेटिक्स स्पर्धेला प्रारंभ झाला. या स्पर्धेत बीड, छत्रपती संभाजीनगर, नंदुरबार-१, नंदुरबार-२, अहिल्यानगर, नाशिक, पालघर, पुणे, धुळे, धाराशिव जिल्ह्यातील २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. दोन दिवसीय संकुलस्तरीय स्पर्धेस विद्यालयाचे प्र. प्राचार्य डी. व्ही. बडे यांच्या हस्ते हिरवा ध्वज दाखवून गुरुवारी (दि. १६) सायंकाळी प्रारंभ करण्यात आला. या स्पर्धेतून जुलैमध्ये होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. या खेळासाठी गणेश जळके, राहुल जाधव, राहुल बोबडे, राजेश जगताप, छाया घोडके आदी पंच म्हणून काम पहात आहेत. विद्यालयाचे प्र. प्राचार्य डी. व्ही. बडे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा शिक्षक सनी जाधव प्रियंका लवटे, प्रमोद खरबास, निषाद भूते आदी सर्व शिक्षक परिश्रम घेत आहेत. या स्पर्धेत १००, २००, ४००, ६००, ८००, १५००, ३०००, ५००० मीटर धावणे, गोळा फेक, थाळीफेक, भालाफेक, उंच उडी, लांब उडी, तिहेरी उडी, क्रॉस कंट्री, अडथळा शर्यत अशा वेगवेगळ्या खेळांचा समावेश आहे. या स्पर्धेत बीड, छत्रपती संभाजीनगर, नंदुरबार - १, नंदुरबार - २, अहिल्यानगर, नाशिक, पालघर, पुणे, धुळे, धाराशिव. या स्पर्धा मुले व मुली अशा दोन्ही विभागातून होत आहे. यामध्ये १४, १७ व १९ वयोगटात या स्पर्धा होत आहेत. यामध्ये राज्यभरातील दहा संघांनी सहभागी झाले. स्पर्धक उत्स्फूर्त सहभागी झाले.

# पुढील काळात भारत हा रोटरीचे आशास्थान असेल – प्रांतपाल सुधिरजी लातुरे




**धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-** रोटरी क्लब धाराशिव येथे जिल्हा राज्यपाल रो. सुधीर लातूरे यांचा अधिकृत दौरा उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. या दौऱ्यादरम्यान शिक्षण, सार्वजनिक प्रतिमा, समाजसेवा व रोटरीच्या विविध उपक्रमांचा सखोल आढावा घेण्यात आला.

दौऱ्याची सुरुवात धाराशिव येथील ए. पी. प्राथमिक शाळा येथे भेट देऊन करण्यात आली. सदर शाळा रोटरी क्लब धाराशिवने Happy School म्हणून दत्तक घेतली असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा उभारणी, शैक्षणिक साहित्य वितरण, स्वच्छता व गुणवत्तावृद्धी अशा विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्हा राज्यपालांनी शाळेतील सुविधांची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व क्लबच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

यानंतर धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर रोटरी क्लब धाराशिवतर्फे उभारण्यात आलेल्या रोटरी ब्रँडिंग बोर्डाचे उद्घाटन जिल्हा राज्यपालांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमामुळे रोटरीच्या सेवाभावी कार्याची व्यापक ओळख समाजापर्यंत पोहोचणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुढे वसुदेव वस्ती, उंबरे कोठा (धाराशिव) येथील पलावरची शाळा येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना व्यवसाय गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच समाजातील कर्तृत्ववान व्यक्ती, पत्रकार बंधू-भगिनी तसेच नव्याने रोटरी परिवारात सहभागी झालेल्या सदस्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात रो. सुधीर लातूरे यांनी रोटरीचा मूलमंत्र Service Above Self अधोरेखित करत, निः स्वार्थ सेवाभावातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे आवाहन केले. त्यांनी क्लबच्या विविध उपक्रमांचे कौतुक करत आगामी काळात अधिक व्यापक व परिणामकारक प्रकल्प राबवण्याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये डिस्ट्रिक्ट तर्फे दिला जाणारा आत्मनिर्भर पुरस्कार युवा उद्योजक अनिल सावंत व डिस्ट्रिक्ट तर्फे रोटरी सुरक्षा पुरस्कार हा अपंगत्व असलेल्या योगदानाबद्दल मयूर काकडे यांना देण्यात आला

तसेच समाजातील विविध लोकांना वोकेशनल अवार्ड ने सन्मानित करण्यात आले या मध्ये पांडुरंग घोडके, पोपट कसबे आशा कार्यकर्त्या सिमा थोरात,बेलुरे, यांचा समावेश होतो


कार्यक्रमादरम्यान क्लब अध्यक्ष रोटे. रणजीत रांदिवे यांनी अध्यक्षीय भाषणातून क्लबच्या वर्षभरातील कामगिरीचा आढावा मांडला, तर सचिव रोटे. प्रदीप खमकर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

या कार्यक्रमास फर्स्ट लेडी रोटे. संगीता सुधीर लातुरे मॅडम, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी रोटे. टापडिया, असिस्टंट गव्हर्नर डॉ. गिरीश कुलकर्णी व सौ. कुलकर्णी मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच क्लबचे सर्व संचालक मंडळ (BOD) सदस्य व रोटेरियन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा दौरा रोटरी क्लब धाराशिवसाठी प्रेरणादायी ठरला असून, समाजहिताच्या विविध उपक्रमांद्वारे रोटरीची सेवा अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

# ३१५ ग्रामस्थांना विविध शासकीय योजनांचा लाभ:सेवा शिबिरातून यंत्रणा पोहोचली गावात



भूम (प्रतिनिधी)-तालुक्यातील आंबी येथे राम मंदिर परिसरात १७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या शासकीय सेवा शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ३१५ नागरिकांनी उपस्थित राहून विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला.

शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून सेवा पुरविण्यात आल्या. ७/१२ दुरुस्ती संदर्भातील ४ अर्ज स्वीकारण्यात आले, तर डिजिटल ७/१२ चे १२० उतारे वितरित करण्यात आले. याशिवाय ८ अ उताऱ्यांच्या ८३ प्रती नागरिकांना देण्यात आल्या. विविध प्रमाणपत्रांसाठीही नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर अर्ज केले. उत्पन्न प्रमाणपत्रासाठी ३८, रहिवासी प्रमाणपत्रासाठी ७, तसेच जात, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रासाठी ११ अर्जांची नोंद झाली. एकूण ५७ प्रकरणांपैकी ४८ प्रकरणे प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाले.

या शिबिरामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासनाच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती सदस्या प्रियंका युवराज गटकळ, आंबीचे सरपंच विठ्ठल वाघमारे, तित्रजचे सरपंच सुग्रीव मुरूमकर, आंबीचे उपसरपंच युवराज गटकळ, उपसभापती यांचे पती प्रवीण रणबागुल, विकास सोसायटीचे चेअरमन बापू वाघमारे यांच्यासह नायब तहसीलदार प्रविण जाधव, उपअधीक्षक भूमी अभिलेख, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी तसेच एकात्मिक बाल विकास, आरोग्य व कृषि विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

अंगठाटेक नोंदणीसाठी ९ तर संजय गांधीचे २७ अर्ज 'एक खिडकी योजना' अंतर्गत २२ अर्ज प्राप्त झाले असून, त्यामध्ये ई-मोजणीसाठी १३ आणि अंगठाटेक नोंदणीसाठी ९ अर्जांचा समावेश आहे. इतर योजनांमध्ये शिधापत्रिका संदर्भात ९, आधार अद्ययावत करण्यासाठी ७ तर ३४ नागरिकांना आयुष्मान कार्ड वितरित करण्यात आले. तसेच रेशनकार्ड दुरुस्तीचे १ प्रकरण निकाली काढण्यात आले असून संजय योजनेसाठी २७ अर्ज स्वीकारण्यात आले.

# प्रियदर्शनी मराठी प्राथमिक शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व नवोगतांचे स्वागत

धाराशिव (प्रतिनिधी)-मियाँसाहब शैक्षणिक व सेवाभावी संस्था बोरी (ता. जि. लातूर) द्वारा संचलित येथील 'प्रियदर्शनी मराठी प्राथमिक शाळा, धाराशिव' येथे बुधवार, २२ एप्रिल २०२६ रोजी गुणवंतांचा गुणगौरव सोहळा, नवोगत विद्यार्थ्यांचे स्वागत आणि पालक मेळावा अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. जे. जी. सगरे साहेब हे होते. या प्रसंगी प्रमुख उपस्थित मान्यवर म्हणून मा. श्री. फताउल्ला हाशमी, मा. श्री. बापू पटेल, डॉ. अबरार सगरे, मा. श्री. रणजित रणदिवे, मा. श्री. प्रदीप खामकर, मा. श्री. अभिजीत पवार, मा. श्री. पटेल टी. जे., मा. श्री. पठाण जे. एच., श्री. पटेल शफीक, आदिबा मॅडम आणि महजबीन मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या सोहळ्यात शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला, तसेच नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाबाचे फूल देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी आयोजित पालक मेळाव्यात शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता आणि उपक्रमांविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात मा. श्री. जे. जी. सगरे साहेब यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मा. श्रीमती इनामदार बी. एफ. यांनी केले. शाळेच्या प्रगतीत शिक्षक आणि पालकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. हाळीकर झेड. सी. यांनी केले. या सोहळ्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649